cmyk

## संपादकीय

### श्रेय घ्या पण संशय दूर करून

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यासाठी जी 'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई केली ती निश्चितच अभिनंदनीय असली, तरी आता या कारवाईचा धुरळा खाली बसल्यानंतर संशयाचे जे नवीन धुके निर्माण होऊन पहात आहे त्याचाही विचार करावा लागणार आहे. या संपूर्ण मोहिमेमध्ये देशातील सर्वच राजकीय पक्षांनी सरकारच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घेतली असली, तरी कॉँग्रेस पक्षातर्फे सातत्याने या कारवाईतील सत्य समोर आणावे अशी मागणी करण्यात येत होती.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### लाडक्या बहिणींच्या उत्पन्नाची पडताळणी

मुंबई : लाडकी बहीण योजनेत राज्य सरकारने आता निकषानुसार छाननी करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत निकषात न बसणाऱ्या १९ लाखांहून अधिक लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत. आता राज्य सरकारने उत्पन्नाची पडताळणी सुरू केली असून त्यासाठी केंद्रीय अर्थमंत्रालयाकडून माहिती मागवली आहे. त्यामुळे आता अडीच लाखांहून अधिक उत्पन्न असलेल्या बहिणींचा निधी होणार आहे. सरकराच्या या निर्णयामुळे अनेक लाभार्थी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–४० | मंगळवार, दि.३ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### संत गजानन महाराजांची पालखी पंढरपूरसाठी रवाना

शेगाव–बुलढाणा जिल्ह्यातील शेगावचे संत गजानन महाराजांची पालखी आज शेगाववरून पंढरपूरसाठी रवाना झाली. ही पालखी दरवर्षी आषाढी एकादशी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी जात असते. यावर्षी पालखीचे ५६ वे वर्ष असून ५५ वर्षांची परंपरा कायम आहे

### पुणे विद्यापीठात प्रवेशासाठी परीक्षा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारातील शैक्षणिक विभागांमध्ये असलेल्या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी परीक्षा घेण्यात येणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन परीक्षा तीन ते पाच जून दरम्यान होणार होणार आहे.

### पुणे विमानतळावरून २३५ विमानांची ये जा होणार

पुणे –येथील विमानतळावरुन आता २३५ विमानांची ये जा होणार आहे. यापूर्वी दिवसाला २२० विमानांची ये जा होत होती. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी याबाबत हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांना पत्र लिहिले होते. त्यानंतर हवाई दलाकडून आता आणखी पंधरा विमानांना उड्डाणासाठी मंजुरी देण्यात आली आहे.

### भगवान जगन्नाथाच्या रथाला आता सुखोईचे टायर

कोलकाता: इस्कॉनने आयोजित कोलकाताच्या प्रसिद्ध जगन्नाथ रथयात्रेत यावर्षी एक अनोखा आणि मोठा बदल करण्यात आला आहे. भगवान जगन्नाथ बलभद्र आणि सुभद्रा यांचे रथ सुखोई लढाऊ विमानाच्या टायरवर चालतील. या बदलामुळे गेल्या ४८ वर्षांची परंपरा मोडली आहे, ज्यामध्ये बोईंग विमानांच्या चाकांच्या मदतीने रथ ओढला जात होता.

### आली रे आली... हवेत उडणारी बाईक आली

नवी दिल्ली : अनेक दिवसांपासून चर्चा होत असलेली उडणारी बाईक अखेर समोर आलीच असून जपानी स्टार्टअप कंपनी एअरविन्स टेक्नॉलॉजीसने पहिली हवेत उडणारी हॉवरबाईक अमेरिकेत सुरू असलेल्या ऑटो शोमध्ये सादर केली आहे. ही उडणारी बाईक पुढील वर्षी आंतरराष्ट्रीय बाजारात लॉन्च होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. ही बाईक पूर्णपणे बॅटरीवर चालणारी असून यावर फक्त एकच व्यक्ती प्रवास किंवा उड्डाण करू शकते.

### अंगणवाडी सेविका होणार आता शिक्षिका

मुंबई–नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी यंदापासून केली जाणार आहे. अंगणवाडी आणि इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम नवीन असणार आहे. त्यासाठी प्राथमिक शाळांमधील पहिलीला शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण होणार आहे. तर अंगणवाडी सेविकांना देखील कार्यशाळांच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक धोरणानुसार चिमुकल्यांना अध्यापन कसे करायचे, मुलांमध्ये शाळेची गोडी कशी वाढेल, यादृष्टीने प्रशिक्षण दिले जाणार आहे.

# शासनाचे मध शेतीला प्राधान्य;आणखी १० गावांना ५ कोटींचा निधी

## मधाचे गाव हा उपक्रम यशस्वी; मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली अन् परभणी जिल्ह्यातील गावांचा समावेश

**पुणे । प्रतिनिधी**

**मध आणि मधमाश्यांपासून तयार होणाऱ्या उत्पादनांची साखळी प्रक्रिया आणि विक्री व्यवस्था करण्याच्या माध्यमातून मधुपर्यटनासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील पाटगाव येथे प्रायोगिक तत्त्वावर केलेली पहिले मधाचे गाव ही योजना यशस्वी झाली आहे. आता पाटगाव आणि दाजीपूरमध्ये हनी पार्क साकारणार आहे. याशिवाय राज्य सरकार मधाचे गाव ही संकल्पना राज्यातील १० गावांत उभारणार आहे. यासाठी पाच कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली**




**असून, लवकरच हा निधी वितरित होणार आहे. या मध्ये मराठवाड्यातील परभणीच जिल्ह्यातील गावचा समावेश करण्यात आला आहे.**

पाचगाव येथील मध जगभरात पोहोचविण्यासाठी शासन आणि प्रशासनाने जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी मंजूर केला. येथून गतवर्षात ५४ हजार किलो मध मिळाला आहे. आता राज्यातील १० गावांतील मधाच्या गावासाठी एकूण ५ कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. शुद्ध व नैसर्गिक मधाची निर्मिती सामूहिक सुविधा केंद्र व कृषी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून विकास मधाच्या थीमवर गावाचे सुशोभीकरण बी–ब्रीडिंग प्रशिक्षण, मधमाश्यापूरक व औषधी गुणधर्म असलेली वृक्षलागवड बी–ब्रीडिंगमधून मधमाश्यांची संख्या वाढवून परागीभवनाची वाढ होण्यासाठी प्रयत्न मधाचे बँड तयार करून योग्य बाजारभाव मिळवून देणार, परिसरातील पर्यटनस्थळांचा विकास होणार. मधाचे गाव पाटगावच्या यशानंतर आता राज्यातील विविध जिल्ह्यांतील १० गावांमध्ये मधाचे गाव योजना राबविण्यासाठी पाच कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली ◀◀ पान २ वर

# नीट परीक्षा पुढे ढकलली

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर परीक्षा एकाच शिफ्टमध्ये होणार



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**१५ जून रोजी होणारी नीट परीक्षा ही दोन शिफ्टमध्ये न घेता एकाच शिफ्टमध्ये घ्या अशा सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या होत्या. त्यानंतर आता ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून ती एकाच शिफ्टमध्ये घेण्यात येणार आहे.**

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ही परीक्षा एकाच शिफ्टमध्ये होणार असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सने हा निर्णय जाहीर केला आहे. ◀◀ पान २ वर

### परीक्षेत अधिक पारदर्शकता येणार

नीटच्या परीक्षेमध्ये अधिक पारदर्शकता येण्यासाठी ती दोन शिफ्टमध्ये न घेता एकाच शिफ्टमध्ये घेण्यात येणार आहे. त्यासाठी आधी नियोजित केंद्रांपेक्षा अधिक केंद्रांची आणि इतर मूलभूत गोष्टींची गरज पडणार आहे. त्यामुळेच ही परीक्षा पुढे ढकलण्यात येणार आहे. या संबंधित पुढची तारीख ही लवकरच जाहीर करण्यात येईल असे नॅशनल बोर्ड ऑफ एज्युकेशनने स्पष्ट केले आहे.

### ॲडमिट कार्ड चार दिवस आधी

नवी तारीख जाहीर झाल्यानंतर परीक्षेच्या चार दिवस आधी ॲडमिट कार्ड उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. अधिकृत वेबसाइटवर हे ॲडमिट कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. अर्ज क्रमांक आणि जन्मतारीख वापरून उमेदवारांना ते डाऊनलोड करता येईल. ॲडमिट कार्डशिवाय कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

# मतदारसंघतील रस्त्यांसह विविध विषयी आ.क्षीरसागरांनी घेतली बैठक



**बीड । प्रतिनिधी**

मतदारसंघातील रस्ते तसेच विविध विषयांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकीत नगर रोडवरील डिव्हायडर व रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणे, राजुरी ते खरवंडी रस्त्यावरील पुलाचे रखडलेले काम, लिंबागणेश–मांजरसुंबा रस्त्यावरील जाधव वस्तीजवळ साठत असलेले पाणी, बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधार्याचे संथगतीने होत असलेले काम, बीड शहरातील बार्शी रोडवर असलेला राष्ट्रवादी भवन समोरील मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच नगरपरिषदेकडून शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम व पाणीपुरवठा या विविध विषयांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेतला.

मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागातील रस्ते, पूल ◀◀ पान २ वर

# राज्यात मान्सूनचा वेग मंदावला

## आयएमडीच्या नव्या अंदाजाने धाकधूक वाढली

**पुणे । प्रतिनिधी**

गेले काही दिवस राज्याच्या विविध भागांमध्ये जोरदार पाऊस सुरू होता, मात्र आता पावसाचा जोर ओसरला असून मान्सूनबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. राज्यात मान्सूनचा वेग मंदावला असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

यंदा मान्सून वेळेआधीच महाराष्ट्रात दाखल झाला आहे, सामान्यपणे सात जूनच्या आसपास राज्यात मान्सूनची एन्ट्री होत असते, मात्र यावर्षी २५ मे रोजीच मान्सूनचं महाराष्ट्रात आगमन झाले. म्हणजेच तब्बल १२ दिवस वेळेपूर्वी मान्सून राज्यात दाखल झाला. मान्सून राज्यात दाखल झाल्यानंतर ◀◀ पान २ वर

# देशमुख यांच्या कुटुंबीयांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

## जिजाभाऊंचे अकाली निधन ही कधीही न भरून निघणारी हानी, धनंजय मुंडे भावूक

**परळी वै. । प्रतिनिधी**

**माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज माजी आमदार तथा भाजपचे नेते स्वर्गीय आर. टी. जिजा देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या स्मृतिस आदरांजली अर्पण करत देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले.**

स्व. आर. टी. देशमुख यांचे एका कार अपघातात लातूर जिल्ह्यातून परतत असताना दुर्दैवी निधन झाले होते. मात्र त्यावेळी धनंजय मुंडे हे विपश्यना केंद्रात असल्याने अंत्यविधिस उपस्थित नव्हते. धनंजय मुंडे यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली तेव्हा ते चांगलेच भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. आर. टी. देशमुख हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब तसेच स्व. पंडित अण्णा ◀◀ पान २ वर




# चिंताजनक..! देशात कोरोना संसर्गाचा वेग वाढला

## ● सोमवार पर्यंत एकूण संख्या पोहचली चार हजाराच्या जवळ

**मुंबई । प्रतिनिधी**


मागील काही दिवसांपासून देशातील विविध राज्यांमध्ये कोरोना संसर्ग वाढल्याचे चित्र आहे. सोमवार (दि.२ जून) सकाळ पर्यंत देशात कोरोना सक्रिय रुग्णांची संख्या ३ हजार ९६१ वर पोहोचली. तसेच यावर्षी संसर्गामुळे झालेल्या एकूण मृत्यूंची संख्या ३२ झाली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मते, मागील दिवसाच्या तुलनेत सक्रिय रुग्णांच्या संख्येत २०३ ची वाढ झाली आहे, तर मागील २४ तासांमध्ये चौघांचा मृत्यू झाला आहे. ◀◀ पान २ वर



# गोपीनाथगडावरील आजचा कार्यक्रम प्रेरणा अन् उर्जेचा

## मोठया संख्येने उपस्थित रहा–ना.पंकजाताई मुंडेंनी दिलं सर्वांना निमंत्रण



**परळी वै.। प्रतिनिधी**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा पुण्यतिथी दिन म्हणजेच तीन जून हा गोपीनाथ मुंडे परिवाराचा पारिवारिक कार्यक्रमासून हा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने साजरा होणार आहे.कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन केले असुन सर्वांनी उपस्थित राहावे असे निमंत्रण ना. पंकजाताई मुंडे यांनी दिले आहे.**

याबाबत ना. पंकजाताई मुंडे यांनी एका व्हिडिओद्वारे सर्व मुंडे प्रेमींना आवाहन केले आहे. ३ जून हा दिवस उजडूच नये असे आपल्या सर्वांनाच वाटते. मात्र गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारावर मार्गक्रमण करून प्रेरणा व ऊर्जा घेण्यासाठी तीन जूनला आपण सर्वजण मोठ्या संख्येने गोपीनाथ गडावर येत असता. त्या दृष्टिकोनातून यावर्षीही तीन जून रोजी पारंपरिक पद्धतीने हा ◀◀ पान २ वर

### गोपीनाथगडावर उसळणार अलोट गर्दी

#### रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, वृक्ष रोपांचे वाटप यासह विविध उपक्रमांचे आयोजन



परळी वै.। प्रतिनिधी

आपल्या लाडक्या लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी उद्या ३ जून रोजी गोपीनाथ गडावर राज्यभरातील कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळणार आहे.गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त ३ जून रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असून ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तनाचा सर्वांनी मोठया संख्येने लाभ घ्यावा असं आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

गोपीनाथगड येथे स्मृतीदिनाची जय्यत तयारी झाली आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर अफाट प्रेम करणारे राज्यभरातील असंख्य मुंडेप्रेमी यादिवशी गोपीनाथगड येथे नतमस्तक होऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करणार आहेत.राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुंडे कुटुंबीय आणि राज्यभरातून असंख्य मान्यवर स्मृती दिनानिमित्त गोपीनाथगड येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी गडावर रक्तदान शिबीर, वाहन चालकांची आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, जनावरांना औषधांचे वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांच्या रोपांचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# श्रेय घ्या पण संशय दूर करून

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यासाठी जी 'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई केली ती निश्चितच अभिनंदनीय असली, तरी आता या कारवाईचा धुरळा खाली बसल्यानंतर संशयाचे जे नवीन धुके निर्माण होऊन पहात आहे त्याचाही विचार करावा लागणार आहे. या संपूर्ण मोहिमेमध्ये देशातील सर्वच राजकीय पक्षांनी सरकारच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घेतली असली, तरी काँग्रेस पक्षातर्फे सातत्याने या कारवाईतील सत्य समोर आणावे अशी मागणी करण्यात येत होती.

या लष्करी संघर्षामध्ये पाकिस्तानने भारताची काही विमाने पाडली का, असा प्रश्नही सतत काँग्रेसतर्फे उपस्थित करण्यात येत होता. पण सरकारतर्फे त्याबाबत नेहमीच नकारात्मक उत्तर देण्यात येत होते. पण आता आता देशाचे सरसेनाअध्यक्ष अनिल चौहान यांनी एका परकीय वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये या लष्करी कारवाईत भारताची विमाने पडल्याची अप्रत्यक्ष कबुली दिल्याने काँग्रेसने उपस्थित केलेला प्रश्न अधोरेखित होत आहे. या लष्करी संघर्षामध्ये भारताची किती विमाने पडली याचा विचार करण्यापेक्षा भारताने चुका सुधारूण नंतर यशस्वीपणे कारवाई पूर्ण केली हे जास्त महत्त्वाचे असल्याचे विधान अनिल चौहान यांनी केले आहे.

साहजिकच आता भारत सरकारला याबाबत जो संशय निर्माण झाला आहे तो दूर करावा लागणार आहे. कोणत्याही लष्करी संघर्षामध्ये यात सहभागी असणार्या दोनही बाजूंची हानी होतच असते. त्यात वेगळे काही नाही. त्यामुळे जर या लष्करी संघर्षामध्ये भारताची काही विमाने पाडली असतील किंवा त्यांना नुकसान पोहोचले असेच तर ते मान्य करण्यात काही वेगळे आहे असे नाही. या लष्करी संघर्षामध्ये भारत पाकिस्तानपेक्षा वरचढ होता हे दाखवण्याच्या नादामध्ये जर काही गोष्टी लपवल्या जात असतील, तर मात्र ते गंभीर मानावे लागेल. दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्ष संपवण्यामागे अमेरिकेची महत्त्वाची भूमिका असल्याची घोषणा केली आहे.

लष्करी संघर्षाला पूर्णविराम देण्यामागे अमेरिकेचा कोणताही हात नव्हता अशी भूमिका जरी भारत सरकारने घेतली असली तरी ट्रम्प यांनी आतापर्यंत किमान ११ वेळा या विषयाचा पुनरुच्चार केला आहे हेसुद्धा विसरता येत नाही. म्हणूनच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्षामध्ये अमेरिकेची निश्चित भूमिका काय याबाबतही संशयाचे धुके निर्माण झाले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा लष्करी संघर्ष आण्विक युद्धापर्यंत पोहोचण्याचा धोका असल्यामुळे आम्ही मध्यस्थी केली, असा दावा जरी ट्रम्प यांनी केला असला तरी अनिल चौहान यांनी या मुलाखतीमध्ये हा लष्करी संघर्ष आण्विक संघर्षापर्यंत पोहोचला नव्हता याचा स्पष्टपणे खुलासा केला आहे हेसुद्धा बरे झाले. अर्थात, अद्यापही या विषयातील अनेक गोष्टी स्पष्टपणे समोर आलेल्या नाहीत. भारताने या लष्करी संघर्षामध्ये पाकिस्तानवर संपूर्णपणे मात केली हे जरी वास्तव असले, तरी या निमित्ताने भारताचे किती लष्करी नुकसान झाले ही गोष्टसुद्धा समोर येणे आवश्यक आहे. लष्करी तज्ज्ञांच्या मते, विमान पाडणे या विधानाचा वेगळाही अर्थ असू शकतो. म्हणजेच लष्करी कारवाईमध्ये विमानाला एखादा धक्का पोचून ते शत्रूच्या हद्दीत न पडता पुन्हा मूळ तळावर येते आणि दुरुस्ती करून पुन्हा एकदा त्या विमानाला लष्करी संघर्षामध्ये पाठवले जाते. अनिल चौहान यांनी अप्रत्यक्षपणे दिलेल्या कबुलीप्रमाणे भारताची काही विमाने पाकिस्तान हद्दीत पडली की विमानाला नुकसान पोहोचल्यामुळे ही विमाने पुन्हा भारतीय हद्दीत येऊन ती दुरुस्त करून त्यांना लष्करी संघर्षासाठी तयार करण्यात आले, याबाबतही खुलासा होण्याची गरज आहे. १९९९ च्या सुमारास जेव्हा कारगिलचा लष्करी संघर्ष झाला होता त्यानंतर बाजपेयी सरकारने या संपूर्ण कारवाईचा आढावा घेतला होता आणि त्याबाबतचा एक संपूर्ण अहवाल संसदेमध्ये सादर केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनेसुद्धा आता या संशयाचे धुके कमी करण्यासाठी या लष्करी कारवाईचाही आढावा घेणारा एक विस्तृत अहवाल तयार करून तो संसदेमध्ये सादर करायला हवा. त्यामध्ये प्रत्यक्ष कारवाई कशाप्रकारे झाली, पाकिस्तानचे किती नुकसान झाले, किती दहशतवादी तळांवर हल्ले झाले किंवा या लष्करी कारवाईमध्ये भारताचे किती नुकसान झाले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या संपूर्ण कारवाईमध्ये अमेरिकेची भूमिका काय होती या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारा हा अहवाल जर संसदेत मांडण्यात आला तरच हे संशयाचे धुके कमी होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा गृहमंत्री अमित शहा गेल्या काही कालावधीमध्ये ज्या ज्या ठिकाणी दौर्याला जात आहेत त्या त्या ठिकाणी 'ऑपरेशन सिंदूर'बाबत सरकारची आणि स्वतःची पाठ थोपटून घेताना दिसत आहेत. पण या ऑपरेशन बाबत जे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांची उत्तरे मात्र देताना ते दिसत नाहीत. ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले आणि पाकिस्तानने अप्रत्यक्ष शरणागती पत्करली हे उघड असले, तरी या संघर्षामध्ये भारताने काय कमावले आणि काय गमावले याची माहिती देशवासीयांना करून देणे सर्वात महत्त्वाचे आहे. सरकारी पातळीवर अधिकृतपणे जोपर्यंत अशा प्रकारची माहिती दिली जात नाही तोपर्यंत संशयाचे हे धुके जास्तच दाट होत राहणार आहे. त्यामुळे आणखी काही नवीन प्रश्नांची निर्मिती होणार आहे. हे टाळायचे असेल तर सरकारने या कारवाईचा एक विस्तृत अहवाल संसदेमध्ये सादर करून या विषयाला पूर्णविराम देण्याचा विचार करायला हवा.

# जिल्हाधिकारी साहेब आश्रम शाळेतील विद्यार्थी मृत्यूप्रकरणाची चौकशी करा!

जालना । प्रतिनिधी

तक्रार करून पंधरा दिवस झाले तरी जिल्हाधिकारी लक्ष द्यायला तयार नाही. मृत्यू झाल्यानंतर तरी न्याय मिळावा अशी अपेक्षा आई-वडिलांना असती. धामनगावच्या आश्रम शाळेतील विद्यार्थी मृत्यूप्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करा या मागणीसाठी तक्रार केली तरी चौकशी करण्यात येत नाही राजकीय पुढार्यांचं ऐकू नका मृत्यू झालेल्या आई-वडिलांना न्याय देण्याचं काम करा अशी मागणी पण करण्यात येत आहे. यामुळे आपुल काहीतरी थोडे चांगलं काम करून पुण्या मिळेल असं काम करा असे तक्रारदार यांच्याकडून बोलले जात आहे. तक्रार करून सुद्धा चौकशी होत नाही स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष / यूथ रिपब्लिकन व रिपब्लिकन बहूजन फोर्स संघटना च्या




वतीने २ जून २०२५ पासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू करण्यात आले. सदर उपोषणास जिल्हाध्यक्ष विठ्ठल गडवे यांच्यासह मुकूंद दाभाडे, अशोक उगले, महेंद्र गवई आदि उपोषणास बसले आहे.

या उपोषणास रिपाइंचे नेते अॅड. ब्रह्मानंद चव्हाण, अॅड. महेश धन्नावत व इतरांनी भेट दिली. धामणगांव येथे माँ मीनाताई ठाकरे प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळा शिक्षण संस्था असून या शिक्षण संस्थे मध्ये मागासवर्गीय विद्यार्थी शाम शंकर काळुंखे वय १२ वर्षे इय्यता ६वी मध्ये शिकणारा विद्यार्थी अचानक मृत पावला. सदरिल मागासवर्गीय विद्यार्थी दुषित पाणी पिल्याने आजारी पडला दोन दिवस उलटले तरी देखिल त्यास दवाखाण्यात नेले नाही उलट त्यास डेटबार गोळया दिल्या. त्या खाल्ल्यानंतरच सदर विद्यार्थी मृत पावला. ही घटना संस्थेच्या निवासी आश्रम शाळेच्या वस्तिगृहात दि. २३ एप्रिल २०२५ ला दुपारी ५ वाजेच्या सुमारास घडली. मयत झाल्यानंतर शाम काळुंखे यास राजूर येथिल प्राथामिक आरोग्य केंद्रात नेवून शवविच्छेदन करण्यात आले. या प्रकरणी वस्तिगृह अधिक्षक हारिदास घुगे व मुख्याध्यापक बालाजी चव्हाण हे दोषी असल्याने त्यांच्याविरूध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवून अॅट्रासिटी अॅक्ट नुसार नूसार गुन्हा दाखत करण्यात यावा. शासनाच्या बिंदू नियमालीनूसार शिक्षक भरती न करता नियम बाय्य शिक्षक भरती करण्यात आली असल्याने त्याना काढून टाकण्यात यावे, नांगरी सुविधा अभावी व दूषित पिण्याच्या पाण्यामूळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याने संस्थेची मान्यता रद करण्यात यावी ,मृत्यू पूर्वी देण्यात आलेल्या गोळया कोणत्या डॉक्टर च्या सल्यानूसार व कोणत्या मेडिकल वरून घेण्यात आली या बाबत चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी उपोषण सुरू आहे.

# शिक्षक भरती घोटाळ्याची न्यायालयीन चौकशी करा-अनिल देशमु

नागपूर । प्रतिनिधी

**शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये नियमबाह्य पद्धतीने अनेक बोगस तुकड्यांना मंजुरी देण्यात आली आहे. याबाबत न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शरद पवार पक्षाचे नेते आणि माजी मंत्री अनिल देशमुख यांनी केली.**

अनिल देशमुख म्हणाले, शिक्षक भरती घोटाळा फक्त नागपूर जिल्ह्यापुरता मर्यादित नसून, राज्यात अनेक ठिकाणी हा घोटाळा झाला आहे. राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघातही हा घोटाळा झाला आहे. २०१५ पासून नव्या तुकड्यांना मान्यता देण्यात येऊ नये असे असताना, दादा भुसे यांच्या मालेगाव मतदारसंघात अनेक शाळांमध्ये बॅक डेटमध्ये तुकड्यांना मान्यता देऊन शंभर शिक्षकांची बॅक डेटमध्ये नेमणूक



केली आहे. एक एक शिक्षक दोन शाळेत नोकरीवर दिसून येत आहे. अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांमध्ये हा प्रकार जास्त दिसून येत असल्याचे अनिल देशमुख म्हणाले. शिक्षण मंत्रांच्या मतदारसंघात एवढ्या मोठ्या प्रमाणात बोगस तुकड्यांना नियमबाह्य पद्धतीने मान्यता देऊन बोगस शिक्षक भरती होत असेल, तर राज्यभरातील शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या माध्यमातून करण्यात यावी, अशी माझी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार आहे असे देशमुख म्हणाले. नागपूर जिल्ह्यातील बोगस शिक्षक घोटाळा संदर्भात एसआयटीची निर्मिती करण्यात आली असून ती एसआयटी सध्या चौकशी करत आहे. मात्र राज्यसाठीची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या मार्फत करावी अशी मागणी आहे.

# धारावी पुनर्विकास मास्टर प्लॅन तात्काळ मागे घेत थेट जनसुनावणी घ्या-वर्षा गायकवाड

मुंबई । प्रतिनिधी

**भाजपा युती सरकारने मंजूर केलेला धारावी पुनर्विकास मास्टर प्लॅन हा पूर्णपणे अन्यायकारक आहे. सार्वजनिक पद्धतीने सल्लामसलत न करता, धारावीतील सर्व घरांचे सर्वेक्षण पूर्ण न करता आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमांचे स्पष्टपणे उल्लंघन करीत सरकारने या प्रकल्पाला दिलेली मंजुरी धक्कादायकच नाही तर असंवैधानिक आणि अनैतिक आहे. हा मास्टर प्लॅन सर्वसमावेशक विकासाचा आराखडा नाही तर तो अंधारात तयार केलेला, बहुसंख्य धारावीकरांच्या आशा-आकांक्षा उद्ध्वस्त करणारा प्रकल्प आहे, म्हणून हा मास्टर प्लॅन तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.**

खा. वर्षा गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन धारावी मास्टर प्लॅनबाबत आक्षेप नोंदवत त्यांना एक निवदेन दिले. यावर खा. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, एमआरटीपी कायद्यानुसार कोणताही विकास आराखडा तयार करण्यापूर्वी नागरिकांच्या सूचना, हरकती व निवेदने मागवून घेणे बंधनकारक आहे. मात्र आपल्या सरकारने २०१६ मधील जुना निर्णय पुन्हा जीवंत करून या कायद्याला बगल दिली आहे. तीन वर्षांनंतरही केवळ ५६,९७१ घरांचे (फक्त ४०% धारावी) सर्वेक्षण झाले आहे. हे सर्वेक्षण सरकार किंवा खासगी संस्थेने नव्हे तर अदानी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनीच केले आहे, ज्यामुळे यांच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सध्याचा प्लॅन केवळ ७०,००० कुटुंबांच्या विस्थापनाची, पुनर्वसनाची हमी देतो, ते सुद्धा रेल्वेच्या जमिनीवर.. संपूर्ण मालकी हक्काशिवाय. उरलेले लाखो धारावीकर डम्पिंग ग्राउंड्स, मिठागराच्या जमिनी किंवा मुंबईबाहेर हकलले जाणार. हे पुनर्वसन नाही तर सामूहिक पद्धतीने निष्पाप लोकांची केलेली हकालपट्टी आहे. खासदार वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या, धारावीकरांना त्यांचे घर व व्यवसाय सोडून जाण्यास प्रवृत्त केले जात आहे त्याचवेळेस अदानीला १४ कोटी चौरस फूट विक्रीयोग्य बांधकाम क्षेत्र बहाल केले जात आहे. जे धारावीच्या क्षेत्राच्या सहापटीहून अधिक आहे. आणि त्यातून १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नफा अपेक्षित आहे. हे योग्य आहे का? सर्वेक्षणापासून प्लॅनच्या मंजुरीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया गोपनीयतेने दबावाखाली व फसवणुकीच्या पद्धतीने पार पडली आहे. धारावीकरांना पूर्णपणे अंधारात ठेवण्यात आले आहे.

## पान १ वरून...

### शासनाचे मध शेतीला प्राधान्य;आणखी

आहे. या गावांमध्ये हा प्रयोग यशस्वी झाला तर राज्यभरात याची व्याप्ती वाढणार आहे.

प्रस्तावित १० गावे आणि मंजूर निधी

घोलवड, जि. पालघर - (५४ लाख)
भंडारवाडी, जि. नांदेड - (५३ लाख)
बोरझर, जि. नंदूरबार - (४८ लाख)
काकडदाभा, जि. हिंगोली - (४९ लाख)
चाकोरे, जि. नाशिक - (४०.२२ लाख)
उडदावणे, जि. अहिल्यानगर - (४६.७५ लाख)
शेलमोहा, जि. परभणी - (५४ लाख)
सिंथीविहिर, जि. वर्धा - (५४ लाख)
सालोशी, जि. सातारा - (४९ लाख)
आमझरी, जि. अमरावती - (५४ लाख)

------------

### मतदारसंघतील रस्त्यांसह विविध

आणि विविध त्यासंबंधित विविध विषय तसेच शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीत नुकत्याच नवीन झालेल्या नगर रोडवरील दुभाजकांवर आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्षारोपण करणे, नवगण राजूरी येथे खरवंडी ते राजूरी रस्त्यावरील पूलाचे रखडलेले काम, लिंबागणेश ते मांजरसुंबा रस्त्यावर जाधववस्ती जवळ पाणी साठते यावर मार्ग काढणे, बीड शहरात बिंदुसरा नदीवर बंधारा कम पुलाचे काम संथगतीने सुरू आहे या कामाची गती वाढवणे, बार्शी रोडवरील राष्ट्रवादी भवन समोर पडलेला मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम आणि पाणी पुरवठ्याच्या कामांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेऊन संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नगर रोडवर रस्ता क्राँसीगसाठी जिल्हाधिकार्यांच्या दालनात बैठक

नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयाकडे जाण्यासाठी रस्ता क्रॉसिंग असणे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून सर्व स्तरांतून मागणी होत आहे. यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. काही दिवसांपूर्वीच आ.क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली होती. त्यानंतर आता मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयासमोर रस्ता क्रॉसिंग करण्याची आग्रही मागणी आ.क्षीरसागर यांनी केली.

------------

### नीट परीक्षा पुढे

या आधी नीट परीक्षा (२०२५) ही १५ जून रोजी दोन शिफ्टमध्ये घेण्यात येणार होती. परीक्षा आता एकाच शिफ्टमध्ये होणार असल्याने परीक्षार्थी विद्यार्थ्यांनीही समाधान व्यक्त केले आहे.

---------

### देशमुख यांच्या कुटुंबीयांचे धनंजय मुंडे

मुंडे यांच्या सोबत अगदी तळागाळात काम केलेले एक सच्चे सहकारी म्हणून सुपरिचित होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना मुंडेसह देशमुख कुटुंबीय सुध्दा भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. जीजांचे अकाली निधन ही देशमुख कुटुंबाइतकीच मुंडे कुटुंबाची सुद्धा हानी असून आता तिहाने कधीही भरून निघणार नाही अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. यावेळी आरटीजीसांचे ज्येष्ठ बंधू एच. टी. देशमुख एम.टी देशमुख, जे. टी. देशमुख, पुत्र रोहित देशमुख, राहुल देशमुख, अभिजित देशमुख यांसह देशमुख कुटुंबीय तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, माणिकभाऊ फड, रामेश्वर मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

-------------

### राज्यात मान्सूनचा वेग

गेले पाच ते सहा दिवस राज्यात पावसाचा चांगलाच जोर पाहायला मिळाला, अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस झाला, मात्र आता राज्यातील पावसाचा जोर काही प्रमाणात ओसरला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून आता मान्सूनबाबत नवा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान मागील काही दिवसांपासून सातत्याने कोसळणाऱ्या पावसाने सर्वांची चिंता वाढवली होती, यावर्षी वेधशाळेने ज्याप्रमाणे अंदाज वर्तवला आहे, त्याप्रमाणे पाऊस हा जास्त होण्याची शक्यता आहे, राज्याच्या अनेक भागात १०८ टक्क्यांहून अधिक पाऊस होईल असा अंदाज आहे. सध्या पीक पेरणीच्या बाबतीत शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, असे हवामान तज्ज्ञ रामचंद्र साबळे यांनी म्हटले आहे.

**काय आहे नवा अंदाज ?**

महाराष्ट्रात पावसाने उघडीप दिली आहे. मान्सूनच्या वाऱ्याचा जोर कमी झाला आहे, पुढील ५ ते ७ दिवस अशीच परिस्थिती असणार आहे, १० ते १२ जूनपर्यंत पावसाची उघडीप असणार आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी शेतीच्या मशागतीची कामं हाती घेतली पाहिजेत, असे पुणे हवामान विभागाचे हवामान तज्ज्ञ एस. डी. सानप यांनी म्हटले आहे.

**राज्यात सरासरी पेक्षा अधिक पावसाची शक्यता**

यंदा देशासह राज्यात मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला आहे, यावर्षी राज्यात पावसाचं प्रमाण हे सरासरीपेक्षा अधिक असेल असा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे, यंदा देशभरात १०८ टक्के इतका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

------------------

### चिंताजनक..! देशात कोरोना

ताज्या आकडेवारीनुसार, रविवारपासून दिल्लीत सर्वाधिक ४७ रुग्णांची नोंद झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये ४४, केरळमध्ये ३५, महाराष्ट्रात २१, गुजरातमध्ये १८ आणि कर्नाटकात १५ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. उत्तर प्रदेशात आठ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. राजस्थानमध्ये सात, मध्य प्रदेशात चार, बिहारमध्ये तीन आणि छत्तीसगडमध्ये एक रुग्ण आढळला आहे. दिल्ली, केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी एका कोरोना रुग्णाचा मृत्यू झाला आहे. दिल्लीत २२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. तिला फुफ्फुसांशी संबंधित आजार होता. तामिळनाडूमध्ये २५ वर्षीय पुरुषाला दम्यासारखे आजार होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात ४४ वर्षीय पुरुषाचा मृत्यू झाला आहे.

**परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्र पूर्णपणे तयार - केंद्रीय आरोग्य मंत्री**

केंद्रीय आरोग्य आणि आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी म्हटले आहे की, केंद्र कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. आमचा केंद्रीय आरोग्य विभाग आणि आयुष मंत्रालय पूर्णपणे सतर्क आहे आणि सर्व राज्यांमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत. आरोग्य आणि आयुष सचिव तसेच इतर संबंधित मंत्र्यांशी बोललो आहोत. मागील कोविड-१९ लाटे दरम्यान विकसित केलेल्या पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला आहे. सरकार कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार असल्याचे ते म्हणाले.

------------

### गोपीनाथगडावरील आजचा

पुण्यतिथी दिन साजरा केला जाणार आहे. रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन व महाप्रसाद असा हा गोपीनाथ मुंडे परिवाराचा पारिवारिक कार्यक्रम आहे.तरी सर्वांनी तीन जून रोजी सकाळी ११ वाजता गोपीनाथ गडावर उपस्थित राहावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

-------------

### गोपीनाथगडावर उसळणार

येणार आहेत.

**ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन**

सामाजिक उपक्रमा बरोबरच उद्या दुपारी १२ ते २ वा. यावेळेत प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गडावर येणाऱ्या मुंडे भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि महाप्रसादाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

cmyk

## दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने टाचणवही स्पर्धा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दुर्गप्रेमी मंडळ आयोजित टाचणवही स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. या स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष आहे.दुर्गप्रेमी मंडळाच्या या स्पर्धेत एकूण अकरा स्पर्धकांची नोंदणी होती, त्यामध्ये आठ जणांनी टाचणवही जमा केलेली होती.या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक कु.सई योगेश कुलकर्णी ही ठरली,त्याचे स्वरूप १०००/-रु. नगदी,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तर सत्यम सतिश तट यास व्दितीय पारितोषिक (७५०/- रु. नगदी, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह ) प्रतिक दत्तत्रय जाधव यास तृतीय पारितोषिक (५००/- रु. नगदी, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह ) आणि उत्तेजनार्थ पारितोषिक आरुषी अशोक गायकवाड हीला मिळाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिलिप कुलकर्णी होते. तर प्रमुख अतिथी दत्तप्रसाद गोस्वामी, जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक अनंतराव देशपांडे, ॲड.कल्याणीताई विर्धे, आणि जेष्ठ पत्रकार राहुल देशपांडे होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्ती व योगेश्वरी देवी प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर स्वरगंध चे संचालक भागवत आचार्य यांनी शिवगीत सादर करुन कार्यक्रमाचा उत्साह वाढवला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दुर्गप्रेमी मंडळाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी यांनी केले.दत्तप्रसाद गोस्वामी यांनी अफजल खानाच्या वधामागील छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले नियोजन सांगितले. संचालन ॲड.बळिराम पूरी यांनी तर आभार वैभव कुलकर्णी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी यांच्यासह नितीन शिनगारे व इतरांनी परिश्रम घेतले.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०३ जून २०२५



# श्री. योगेश्वरी देवल कमिटीच्या नवीन विश्वस्त मंडळाचा पारदर्शक कारभार

**भाविक भक्तांना सुविधा-मंदिर परिसर विकास आणि जिर्णोद्धारासाठी प्रयत्न सुरू पत्रकार परिषदेतून विश्वस्त मंडळाची माहिती**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री. योगेश्वरी देवल कमिटीच्या नविन विश्वस्त मंडळाने अल्पावधीतच पारदर्शक कारभारातून भाविक भक्तांचा विश्वास संपादन केला. विविध उपक्रम राबवून भाविक भक्तांची मने जिंकली. अशी माहिती नविन विश्वस्त मंडळाने श्री. आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेवून दिली. १-६-२५ रविवार । १२.३० २१ मोडर रोजी या ठिकाणी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून सांगितले की, मा.धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्या अदेशानुसार २०२४ साली मा. धर्मादाय आयुक्त बीड यांनी शासनाच्या सर्व नियम व अटींच्या अधिन राहून दिनांक ०१/०७/२०२४ रोजी श्री. योगेश्वरी देवल कमिटीच्या नविन विश्वस्त मंडळाची निवड केली. सर्व नवनिर्वाचीत विश्वस्त मंडळाच्या सदस्यांची दिनांक ०१/०७/२०२४ रोजी देवल कमिटीचे पदसिध्द अध्यक्ष तहसिलदार श्री. विलास तरंगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली. या बैठकीत अंबाजोगाई शहराचे आराध्य, ग्रामदैवत माता श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या उपाध्यक्षपदी अंबानगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तर सचिवपदी प्रा. अशोक लोमटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सहसचिवपदी संजय भोसले तसेच कोषाध्यक्षपदी शिरीष पांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याचे कमिटीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे यांनी त्यावेळी जाहीर केले. निवडी जाहीर केल्यानंतर तहसीलदार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना मी आई श्री योगेश्वरी जगदंबेची शपथ घेतो की, आम्ही श्री योगेश्वरी देवी मंदिर विश्वस्त न्यासाचा व देवी भक्तांच्या हिताचेच निर्णय घेऊ, सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शी ठेवू, त्याचबरोबर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही आग्रही व प्रयत्नशील राहू अशी शपथ दिली. त्यानंतर सर्व नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाची पहिली बैठक होऊन त्या बैठकीत दिनांक १८/०७/२०२४ पासून मातेच्या महाआरतीनंतर दुपारी १२ ते दुपारी २ या वेळेत (अन्नछत्र) महाप्रसाद सुरू



करण्याचा ऐतिहासीक असा पहिला ठराव घेण्यात आला. सदरील महाप्रसाद त्या दिवसापासून आजतागायत दररोज चालु आसून अंदाजे ७०० ते ८०० भक्त याचा लाभा घेतात दुसऱ्या ठरावात मंदीराचे दैनंदिन व्यवस्थापन चांगले रितीने चालविण्यासाठी मंदीराचे उत्पन्न वाढविण्यासाठी सकाळी पैठणीसह देवीची प्रथम महापुजा करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये प्रथम महापुजेस येणाऱ्या दोन व्यक्तीस रू.१०००/- रु ची अभिषेक करण्याची पावती करून प्रथम महापुजा करता येईल. यामध्ये पैठणी (आवश्यक) यामुळे मंदीराचे मासिक उत्पन्न रू.६२०००/-वाढले. मंदीरात होणारे देवीचे अभिषेक हे देवल कमेटीस कळवून व रितसर पावती घेवूनच करावे असा ठराव घेण्यात आला. मंदीरात या अगोदर होणाऱ्या अभिषेक किंवा पुजेची नोंद आल्प प्रमाणात होत होती. हा ठराव मंदीरात पुजा विधी करणाऱ्या ब्राम्हणवृंदांनी देखील मोठ्या मनाने मान्य केला. यामुळे देखील मंदीराच्या मासिक उत्पन्नात रू.१५,०००/- ते २०,०००/- वाढ झाली. तसेच सर्व ब्रम्हवंदाना अभिषेक वाटून आले. पुर्वी एकाच ब्राम्हणाकडून अभिषेक करुन घेतले जात. दररोज रू.५०/- प्रति अभिषेक याप्रमाणे २५ ते ३० अभिषेक दैनंदिन होत असतात. आज मितीस देवस्थानास जवळपास नगदी रोख बँक खात्यात जमा शिल्लक, सोने-चांदीच्या दागीन्यांपासुन अंदाजे रू.१ कोटी रूपये उत्पन्न जमा आहे. यापूर्वी सकाळच्या प्रसादात दररोज फक्त खिचडी/ शिरा वाटप होत होते. त्याचा मासिक खर्च १ लाक्ष रूपये होता असे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत होते. मात्र नवीन विश्वस्त मंडळाने महाप्रसाद, अन्नछत्र सुरू केल्यापासुन अंदाजे ३लक्ष रुपये रक्कमेचा खर्च होत आहे (त्याची सर्व बिले आपणांकडे आहेत) अन्नछत्रामुळे दर्शनासाठी बाहेर गावावरून येणाऱ्या भक्तांची व गावातील भक्तांची सोय झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अंदाजे १० ते १२ वर्षांपासून सौरऊर्जा प्रकल्प नादुरुस्त आवस्थेत पडला होता तो दुरूस्तीसाठी ठराव घेऊन रीतसर नियमाप्रमाणे कोटेशन मागवून घेवून त्या दुरूस्त करून घेण्यात आला. त्यामुळे त्याच रक्कमे मध्ये बंद पडलेल्या सोलार सिस्टीमची दुरुस्ती करून घेतली. ज्यामुळे मंदीराचे एमएसईबीचे वीज बील शुन्यापर्यंत आणण्यात नवीन विश्वस्त मंडळाला यश आलेले आहे. यामुळे मंदीराच्या मासिक खर्चातून रू. २५ ते ३० हजार रूपयांची बचत होऊन तेवढ्या रकमेचे मंदिराचे उत्पन्न वाढणार आहे. मंदीराच्या स्वच्छतेकडे जातीने लक्ष देऊन मंदीराचा कोपरा न कोपरा दररोज स्वतः लक्ष देऊन स्वच्छ केल्या जात आहे. यामुळे मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेला भाविक मंदीरात थोडा वेळ शांत बसून आत्मिक शांततेचा व समाधानाचा अनुभव घेत आहे. दर दोन तासाला मंदीर परिसर

मागील २० वर्षांपासून ठेवी (फिक्स डिपॉझिट) पावत्या रिन्युअल केल्या नाहीत. त्यामुळे सदर रक्कम ही रिझर्व्ह बँकेत जमा आहे. ती रक्कम परत मंदिरास मिळवण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत सदरील रक्कम अंदाचे १ कोटीच्या असपास आहे.

अशी माहिती श्री योगेश्वरी देवी विश्वस्त मंडळाचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, सचिव प्रा. अशोक लोमटे, सहसचिव संजय भोसले, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, विश्वस्त माजी आमदार पृथ्वीराज साठे, सतीश लोमटे, राजाभाऊ लोमटे, अमोल लोमटे, राजपाल भोसले, प्रविण दामा, अजित चव्हाण, रवी कदम, हंसराज देशमुख आणि श्रीमती संध्या मोहिते यांनी आयोजित पत्रकार परिषदेतून दिली.

# प्रख्यात व्याख्याते चंद्रकांत हजारे यांचा श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते जननायक महाराजा यशवंतराव होळकर राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मागील १६ वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय भूमिका बजावत अनेकांना मदतीचा हात देणारे तसेच महापुरूषांचा विचारांचा वारसा हक्क ठिकाणी सांगणारे व्याख्याते चंद्रकांत हजारे यांचा सन्मान ८९ व्या अ.भा.साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस हस्ते करण्यात आला. हजारे यांचा जननायक महाराजा यशवंतराव होळकर राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात आला.

पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, शाल व ग्रंथ असे आहे. या कार्यक्रमास रामानुज रांदड, इस्रोचे शास्त्रज्ञ भाऊसाहेब हाके, डॉ.सोपानराव जटाळ, डॉ.हनुमंत किणीकर, डॉ.संजय गांधी, डॉ.हरीश्चचंद्र



**सामाजिक व साहित्यिक कार्याबद्दल देण्यात आला पुरस्कार**

**१६ वर्षांपासून सामाजिक कार्यात हजारेंचे योगदान**

वंगे, डॉ.देवाशिष रूईकर, डॉ.अशोक मालू, प्रा.लक्ष्मणराव आवाळे, शिवाजीराव आंचुळे, अनिल गोयकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. राजे मल्हारराव होळकर ट्रस्ट, लातूरच्या वतीने ३० मे रोजी सायंकाळी लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात प्राचार्य डॉ.मधुकरराव सलगरे लिखित प्राचीन भारत : गौरवशाली विजयनगर साम्राज्य या ग्रंथाचे प्रकाशन व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे उदघाट ८९ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते राजे मल्हारराव होळकर राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी व्याख्याते चंद्रकांत हजारे यांना सामाजिक व साहित्यिक कार्याबद्दल पुरस्कृत करण्यात आले. चंद्रकांत हजारे यांच्या सामाजिक कार्याबद्दल सांगताना त्यांनी मागील काही वर्षांपासून विविध सामाजिक व राजकीय विषयांवर प्रखरपणे मांडलेले मत, केलेली आंदोलने याचा आढावा घ्यावा लागेल. एवढेच नाही तर त्यांनी सर्व महापुरूषांचे जीवनचरित्र व विचार आपल्या वाणीतून अनेक ठिकाणी विश्लेषणात्मक विचार मांडले आहेत. तसेच मागील ८ वर्षांपासून परिवर्तन संशोधन नांवाचे हजारे साप्ताहिक चालवत आहेत. यामध्ये महत्त्वाच्या अनेक घटनांचे विश्लेषण केले आहे. शिवाय सोशल मीडियाच्या माध्यमातून गोल्डन न्युज सुरू करून ऐतिहासिक स्थळ, येथील वास्तू, याची माहिती व ऐतिहासिक दाखले मांडले आहेत. या सर्व कार्याचा आढावा घेऊन हजारे यांना सामाजिक ऋणातून मुक्त राजे मल्हारराव होळकर ट्रस्टने हा पुरस्कार प्रदान केला आहे. राजे मल्हारराव होळकर ट्रस्टच्या वतीने सहा मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार दिला. दरम्यान सर्वांनी चंद्रकांत हजारे या व्यक्तिमत्वाचे कौतुक केले.


# भारत गौरव ट्रेन - छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ९ जून पासून

## पर्यटकांनी ऐतिहासिक पर्यटनाचा लाभ घ्यावा -पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (), ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. ही यात्रा अंतर्गत ०९ जून २०२५ पासून सुरू होत आहे. या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असे आवाहन पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.

भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी आणि पर्यटन संचालक बी. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ही केवळ एक यात्रा नसून, आपल्या वैभवशाली परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचा आणि स्वाभिमानी इतिहासाचा साक्षात



अनुभव घेण्याची सुवर्णसंधी आहे. भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी ऐतिहासिक उपक्रमासाठी विविध अंगांनी सुसज्ज तयारी केली आहे. भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती पर्यटकांना देण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान, सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी च्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. ५ दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना समृद्ध अनुभव दिला जाईल. प्रत्येक गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले जाईल. इतिहासावर आधारित कार्यक्रम, गाईड्स, तसेच स्थानिक शिवप्रेमी संघटनांच्या सहकार्याने ही यात्रा अधिक संस्मरणीय करण्यात येईल, असे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सांगितले आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांचा तेजोमयी इतिहास, महाराष्ट्राची शौर्यशाली परंपरा, आणि आपली समृद्ध संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याच्या शासनाच्या ध्यासाला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ संपूर्ण समर्पणाने साथ देत आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवे क्षितिज गवसणार असून, प्रत्येक भारतीयाच्या हृदयात शिवप्रेमाची जाज्वल्य ज्वाला जागवली जाणार आहे.या प्रेरणादायी यात्रेत सहभागी होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वसा चालवावा, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा, आणि नव्या पिढीला या इतिहासाचे दर्शन घडवावे'', असे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

या उपक्रमासाठी महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री. चंदशेखर जयस्वाल, वरीष्ठ व्यवस्थापक श्री. संजय ढेकणे तसेच सर्व संबंधित अधिकारी समन्वय साधत परीश्रम करीत असून, छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आणि लोकसंस्कृती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी महामंडळ सतत प्रयत्नशील आहे, असे महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्री. दिपक हरणे यांनी सांगितले आहे.

# अभाविपच्य वतीने तीन दिवस निसर्ग संवाद ग्रामानुभूती शिबिर

बीड । प्रतिनिधी

विकासार्थ विद्यार्थी व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बीड जिल्हा चय वतीने आयोजितदि. २९, ३० व ३१ या तीन दिवसय निसर्ग संवाद. ग्रामानुभूती शिबिराचे आयोजनद्वारका प्रतिष्ठान कडाता.आष्टी येथे शहरी भागातील विद्यार्थीना ग्रामीण संस्कृती चा अनुभव यावा. सामाजिक जाणीव वाढव्यात आणि नेतृत्व गुण विकसित व्हावेत, भारतीय मैदानी खेळ खेळता यावे या हेतूने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात बीड जिल्ह्यातील ५७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. गोरक्षनाथ काकडे अभाविप देवगिरी प्रदेश सह मंत्री स्वप्निल बगाडे, आष्टी शहराध्यक्ष प्रा. अविनाश कंदले, आष्टी शहर मंत्री सागर तोडकर, ग्रामानुभूती शिबिर प्रमुख शिवराज आजबे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून उद्घाटन करण्यात आले . शिबिरात ट्रेकिंग व जंगल भ्रमंती, वन भोजन, करण्यात आली. अभाविप मांडणी स्वप्निल बगाडे यांनी केली. तसेच

अँड. वाल्मीक (तात्या) निकाळजे यांनी संविधानाच्या अमृत महोत्सव निमित्त संविधान विषयची मांडणी केली.अभाविप पूर्व कार्यकर्ते सुनील सानप यांनी विष मुक्त शेती व पाणी व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. तर रोहित दुशी यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यादेवी होळकर यांचा जाज्वल्य इतिहास सांगितला तसेच विविध भारतीय मैदानी खेळ, स्विमिंग, फायर कॅम्प, सह विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. अभाविप बीड शहर अध्यक्ष प्रा.जगन्नाथ चव्हाण, आष्टी शहर मंत्री सागर तोडकर, बीड जिल्हा विस्तारक ज्ञानेश्वर उदेवाल शिबिराचा समारोप केला.

जा. क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१८

कार्यालय नगर परिषद अंबड

दिनांक :२०/०१/२०२५

**नाव बदलण्याचा**

**जाहीरनामा**

अर्जदार श्री/सौ.श्रीमती : रिना बंडू रहाटगांवकर व इतर

न.प मि न ३१ चे हस्तांतरन करणे बाबत

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न प मालमत्ता घर क्र ( ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे /जागेचे नाव बदलून घेऊ इच्छितो ज्याची चतुर: सिमा खालील प्रमाणे आहे जर कोणास याबद्दल आक्षेप असेल तर त्यांनी ह्या जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा नसता कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

चत : सिमा

पुर्व : गणेश तुपे यांचे घर

पश्चिम : पाऊलबुद्धे यांचे घर

दक्षिण: सरकारी रस्ता

उत्तर : पाऊलबुद्धे यांचे घर

**स्वाक्षरीत**

**मुख्याधिकारी नगर परिषद, अंबड**

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### सिंगल युज प्लास्टिकचा

नो प्लास्टिक उपक्रमा अंतर्गत कापडी पिशवी मशीनचे उदघाटन पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज करण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. वैद्यनाथ देवल कमिटीचे राजेश देशमुख, भाजपचे ज्येष्ठ नेते दत्तापा इटके, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, उप जिल्हाधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगरपरिषद मुख्याधिकारी कांबळे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कुरमूडे आदी उपस्थित होते.

मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभही पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक वृक्ष मॉ के नाम हा उपक्रम जाहीर केला आहे. यामध्ये एक आपली आई जीने आपल्याला जन्म दिला तिच्यासाठी एक वृक्ष व दुसरी आपली आई म्हणजे ही सृष्टी तिच्या संवर्धनासाठी एक वृक्ष लावला पाहिजे. त्याचे संवर्धन केले पाहिजे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. वृक्षारोपणाचे कार्यक्रम केवळ राजकीय स्वरूपात करू नका. फोटो पुरते करू नका. तर ते वृक्ष जगवण्यासाठी सुद्धा प्रयत्न करा असे आवाहन पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.

प्लास्टिकमुक्तीचा दृढ संकल्प करा आणि कचरामुक्तीची कास धरा !

सध्या पर्यावरण विभागाच्या वतीने अधिकाधिक प्लास्टिक मुक्तीवर भर दिला जात आहे. या दृष्टीने सर्व ते प्रयत्न केले जात असुन प्रत्येक नागरिकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला पाहिजे. यापुढे एकल प्लास्टिक वापरावर बंधने आणून अधिकाधिक कापडी पिशव्यांचा वापर करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये ही जाणीव जागृती निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असुन सर्व देवालयांशी व देवस्थानांशी बोलून याबाबत आपण पुढचे पाऊल टाकणार आहोत. नागरिकांनी अधिकाधिक कापडी पिशव्यांचा वापर करावा त्यासाठी घरातील पिशवी आणावी किंवा आपण ठिकठिकाणी कापडी पिशव्यांचे मशीन बसवणार आहोत याचा अधिकाधिक वापर करावा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

मध्यप्रदेशातील स्वच्छतेसारखे आपले राज्यही स्वच्छ करुया

मध्य प्रदेशातील स्वच्छता जर बघितली तर ती खरोखरच कौतुकास्पद आहे. मध्य प्रदेशातील स्वच्छतेचे कौतुकच केले पाहिजे. परंतु महाराष्ट्रात मात्र अशा पद्धतीची स्थिती सध्या तरी नाही हे चिंताजनक आहे. हे चित्र आपल्याला बदलायचे आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी जबाबदारीपुर्वक काम करावे त्याबरोबरच नागरिकांनीही स्वच्छतेच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात प्लास्टिक मुक्त आणि कचरा मुक्त परिसर यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. आपल्याकडे याबाबतीत नागरिकांनी जबाबदारीने या गोष्टीचे तंतोतंत पालन केले तर काही दिवसातच आपले महाराष्ट्र राज्य ही स्वच्छ व सुंदर परिसराचे होईल यात काहीही शंका नाही. सध्या पर्यावरण विभागाच्या वतीने अधिकाधिक भर दिला जात आहे. या दृष्टीने सर्व ते प्रयत्न केले जात असुन प्रत्येक नागरिकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला पाहिजे असेही आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

### शिवसैनिकांनो बॅनर

विकणारे, कामावर जाताना मजूर, यांच्यासाठी रेनकोट किंवा छत्र्यांचे वाटप हा एक छोटा प्रयत्न असला, तरी त्यांना दिलासा देणारा हात ठरेल. माझा खरा वाढदिवस तेव्हाच साजरा होईल, जेव्हा गरिबांच्या चेहऱ्यावर तुमच्या मदतीमुळे हास्य उमटेल,'' असं सांगत अनिलदादांनी शिवसैनिकांना एक नवा विचार देत वाढदिवस गरजावंतांना मदतीचा हात द्या असे आवाहन केले आहे.

### दिंद्रुड पोलीस अधिकारी

ढाकणे यांनी कायदा व सुव्यवस्था राखताना कायद्याचा कोणी अवमान करणार नाही यासाठी आपण काम करणार आहोत, अन्याय झालेल्या व्यक्तींवर परस्पर गुन्हा नोंद होताना आपण काळजी घेणार आहोत, कर्तव्याबाबत कुठलीही तडजोड खपवली जाणार नसल्याचे सांगितले. सपोनी अण्णाराव खोडेवाड व पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे यांनी दिंद्रुड परिसरात काम करताना येथील सकारात्मक विचारांच्या लोकांमुळे चांगल्या प्रकारे काम करण्यात आल्या बाबत आनंद व्यक्त केला. प्रस्ताविक पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख, सूत्रसंचालन संतोष स्वामी, आभार नागेश कानडे यांनी व्यक्त केले.

### माजलगाव-तेलगाव रस्त्याचे

इशारा निवेदनाद्वारे दिला असून या निवेदनावर नुमान अलि चाऊस, नारायण तौर,सय्यद तोफिक लाला, सुलतान मन्सुरी, राजू कुरेशी, इनामदार ओमर, मोमीन बागवान, गुड्डू खलील, अलीम सय्यद, शोएब चाऊस, नविवोददीन सिद्दिकी,जुनेद आली,राजू कुरेशी जयपाल भिसे,भाई मुंजा पांचाळ, अनंतराव जगताप, परमेश्वर डाके आदींच्या स्वाक्षऱ्या असून मुक्या व बहिऱ्या सरकारला जागे करण्यासाठी दि ०५ जून रोजी माजलगाव येथे परभणी चौकात सकाळी १०:०० वाजता होत असलेल्या रास्ता रोको आंदोलनामध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड नारायण गोले पाटील यांच्यासह इतरांनी केले आहे.

### पाण्याचा लोकलढा

गेल्या नऊ दिवसांपासून तांदळा येथे उपोषण सुरू आहे. सोमवारी येथे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी भेट दिली. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते म्हणाले, की शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील १४० गावच्या शेतकर्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या भागातील शेतीला धरणाचे पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने या भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी द्यावे, या पाण्यासाठी जो लढा सुरू आहे, हा लढा माझी जबाबदारी असून शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या आंदोलनास सामाजिक कार्यकर्ते दीपक केदार यांनीही भेट दिली. यावेळी बोलताना केदार म्हणाले, की या भागातील शेतीला पाणी मिळाल्यास शेतकर्यांच्या मुलांना स्थलांतर करण्याची वेळ येणार नाही, शेतकर्यांसमोरील प्रश्न सुटतील, या लढ्याची दखल न घेतल्यास आमदारांच्या घरावर मोर्चे काढू, सरकारने हे आंदोलन गांभिर्याने घ्यावे, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी पूजाताई मोरे, ऋषीकेश बेदरे, शेख शफिक, संतोष भारती, गहिणीनाथ महाराज हाकाळे, ओंकार शेंबडे यांनीही विचार व्यक्त केले. यानंतर उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांनी उपचार घेतले.

cmyk

# टोमॅटो उत्पादकांचे अडीच कोटी रुपये थकवले

## नाशिकमध्ये शेतकरी आक्रमक, कांद्याचे लिलाव पाडले बंद

नाशिक: जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतमध्ये टोमॅटो उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांनी कांद्याचे लिलाव ( ) बंद पाडले आहेत. कांदा लिलाव बंद पाडत शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. गेल्या दीड तासांपासून कांदा लिलाव ठप्प आहेत. गेल्या सात महिन्यापासून व्यापाऱ्यांनी टोमॅटो उत्पादकांचे अडीच कोटी रुपये थकल्याने टोमॅटो उत्पादक शेतकरी संतप्त झाले आहेत.

टोमॅटो उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत

बाजार समिती प्रशासनाच्या विरोधात यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणा दिल्या आहेत. पैसे भेटत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार केल्याने तणाव निर्माण झाला आहे. सध्या टोमॅटो उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडले आहेत. कारण त्यांचे मोठ्या प्रमाणात पैसे व्यापाऱ्यांनी थकवले आहेत. यामुळं आज नाशिकच्या पिंपळगाव बसवंत बाजार समितीमध्ये टोमॅटो उत्पदक शेतकरी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. शेतकऱ्यांनी थेट कांद्याचे लिलाव बंद पाडलेआहेत. तसेच लिलाव




बंद पाडल्यानंतर शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन देखील सुरु केलं आहे.

पिंपळगाव बसवंतमध्ये मोठ्या प्रमाणात टोमॅटो आणि कांद्याची आवक

नाशिकच्या पिंपळगाव बसवंतमध्ये मोठ्या प्रमाणात टोमॅटो आणि कांद्याची आवक येत असते. दरम्यान, वापाऱ्यांनी टोमॅटोची खरेदी करुन देखील पैसे दिले नसल्यानं शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव बसवंत या बाजार समितीच्या अंतर्गत व्यापाऱ्यांना टोमॅटोची खरेदी केली होती. मात्र, त्यांनी शेतकऱ्यांची तब्बल अडीच कोटी रुपयांची देणी थकवली आहेत. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, आंदोलन सुरु झाल्यावर व्यापारी काही निर्णय घेतात का हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

# जनावरांतील चयापचयाचे आजार

दुधाळ गाय,म्हैस व्याल्यानंतर ५ ते ६ दिवसानंतर दूध उत्पादन वाढते. ३ ते ४ आठवड्यात दूध उत्पादनाची उच्च पातळी गाठतात. विण्यापूर्वी २ ते ३ आठवडे आणि व्यायल्यानंतरचे २ ते ३ आठवड्यांचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा आहे. संक्रमण कालावधी दरम्यान शरिरक्रियात्मक बदलांमुळे चयापचय क्रियांवर ताण आल्यामुळे शरीरातील जीवरसायनांची (ग्लुकोज, कॅल्शिअम आणि मॅग्नेशिअम) पातळी असमतोल होते. यामुळे चयापचय क्रियांसंबधीत आजार दिसतात.



दुग्ध ज्वर : जास्त दूध देत असलेल्या गाई,म्हशींत व्यायल्यानंतर लगेचच हा आजार दिसतो. शरीरातील विभिन्न क्रिया सुरळीत असण्यासाठी कॅल्शिअमची आवश्यकता आहे. व्याल्यानंतर लगेचच चीक दूध आणि नंतर दूध निर्मितीकरिता जास्त मात्रेत शरीरात कॅल्शिअमची गरज असल्याने आणि संक्रमण कालावधीत कमी प्रमाणात शुष्क पदार्थांच्या उपलब्धतेमुळे शरीरातील कॅल्शिअम जलद गतीने कमी होते.

लक्षणे : व्यायल्यानंतर ४८ ते ७२ तासांनी व्यवस्थितपणे उभे राहता येत नाही, मान वर करता येत नाही. हृदयाची स्पंदने वाढतात. मान समोरच्या पायावर टेकीत डोके मागच्या दिशेने ठेवीत छातीच्या भारावर पहुडलेल्या स्थितीत सुस्त पडून राहातात. शारीरिक तापमान बाह्य वातावरणातील तापमानाशी स्वनियंत्रित करू शकत नसल्याने शारीरिक तापमान कमी होते, गुदद्वार बाहेर येतो, पोट फुगते, लघवी आणि विष्ठेचे उत्सर्जन थांबते, बाहेरील संवेदनांना प्रतिसाद देत नाहीत. आजाराची तीव्रता अधिकच वाढल्यास गाय, म्हैस जमिनीच्या सपाट दिशेत निपचित लोळलेल्या दिसतात आणि डोळ्यांची हालचाल थांबते आणि शारीरिक तापमान ३८ अंश सेल्सिअसपेक्षा कमी होते. निदान : पूर्व इतिहास (व्यायल्याची नोंद), आढळणारी मुख्य लक्षणे (छातीच्या भारावर पहुडलेली स्थिती, मान वर करता न येणे, गुदद्वार बाहेर येणे, लघवी आणि विष्ठेचे उत्सर्जन थांबणे इ.) आणि रक्तातील कमी झालेली कॅल्शिअम पातळीची प्रयोगशाळेत तपासणी करून आजाराचे योग्य निदान करता येते. उपचार : आजाराची लक्षणे तपासून तातडीने पशू तज्ज्ञांच्याकडून उपचार करावेत. व्यायल्यानंतर जास्त दूध उत्पादन असलेल्या गाई,म्हशीत आजाराची दाट शक्यता असल्याने विण्याच्या ३ आठवड्यांपूर्वीपासून कमी प्रमाणात कॅल्शिअम व पोटॅशिअम असलेले खाद्य द्यावे. व्याल्यानंतर १ टक्के कॅल्शिअम व ०.३० ते ०.४५ टक्के मॅग्नेशिअम (शुष्क पदार्थ आधारित) खाद्यातून पुरवावे. व्यायल्यानंतर जीवनसत्त्व डी चे इंजेक्शन ३ दिवस दिल्यास आजारास प्रतिबंध करता येऊ शकते. गाय-म्हैस व्याल्यानंतर दुग्ध ज्वर विकारास प्रतिबंध करण्यासाठी घरगुती उपाययोजना म्हणजे, मातीच्या मडक्यात २० लिटर पाण्यात १ किलो चुना रात्रभर भिजत ठेवावा. २०० मिलि वरची चुन्याची निवळी २०० मिलि ताज्या पाण्यात मिसळून व्यायलेल्या जनावरांना रोज पाजावी. दर २० दिवसांनी नवीन चुन्याचे मिश्रण तयार करावे. दुधाळ गाय-म्हशीला दररोज २० ते २५ ग्रॅम मॅग्नेशिअमची आवश्यकता असते. पिण्याच्या पाण्यातून तज्ज्ञांच्या सल्याने मॅग्नेशिअम किंवा खनिज मिश्रण असलेल्या विटातून नियमितपणे मॅग्नेशिअम पुरविणे गरजेचे आहे.

# काळ्या मक्याच्या 'या' जातीची करा लागवड; मिळेल अधिक उत्पन्न!

मका शेती ही अनेक कारणांमुळे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. मक्याच्या पांढऱ्या आणि लाल जातींव्यतिरिक्त पांढरे कॉर्न आणि स्वीट कॉर्नच्या लागवडीबाबत शेतकऱ्यांची आवड सातत्याने वाढत आहे. तसेच उन्हाळी हंगामातील पेरणीसाठी शेतकऱ्यांकडून काळ्या मक्याच्या लागवडीला प्राधान्य दिले जात आहे. देशातील महानगरांमध्ये २०० रुपये प्रति नग या दराने काळा मका विकला जातो. बहुतेक शेतकऱ्यांना काळ्या मक्याच्या लागवडीबद्दल माहिती नाही. परंतू आता अनेक ठिकाणी याची लागवड होऊ लागली आहे. यासाठी त्याच्या योग्य जातीची निवड, काळ्या मक्याची लागवड पद्धती आणि त्यातून मिळणारा नफा याची माहिती असणे गरजेचे आहे.

काळ्या मक्याची जात : देशात प्रथमच, छिंदवाडा येथील कृषी संशोधन केंद्राने काळ्या मक्याच्या लागवडीवर संशोधन केले आणि मक्याची नवीन जात 'जवाहर मका १०१४' (१०१४ ) विकसित केली. कृषी शास्त्रज्ञ आता या जातीची लागवड करण्याची शिफारस करतात. मक्याची ही जात त्यातील पोषक घटकांमुळे कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी ठरेल. या मक्याचा वापर अनेक आरोग्यदायी उत्पादनांमध्ये शक्य होणार आहे. मक्याची ही जात खोड रोगास तग धरणारी आहे. हा वाण पावसावर आधारित पठारी क्षेत्रासाठी अधिक उपयुक्त आहे.काळ्या मक्याची वैशिष्ट्ये : काळ्या मक्याची 'जवाहर मका १०१४' ही जात ९० ते ९५ दिवसात



तयार होते. मक्याची ही जात कुपोषणाशी लढण्यासाठी प्रभावी आहे. त्यात लोह, तांबे आणि जस्त मोठ्या प्रमाणात आढळतात. मक्याची ही पहिली जात आहे जी पौष्टिक आणि जैव-फोर्टिफाइड आहे.

मक्याचा हा प्रकार बाजारात महागड्या दरात उपलब्ध आहे. एक मका २०० रुपयांना ऑनलाइन विकला जात आहे. त्याची किंमत नेहमी सामान्य मक्यापेक्षा जास्त असते, कारण फार कमी शेतकरी या जातीची लागवड करतात. काळा मका त्याच्या चवीमुळे आणि अधिक पौष्टिक गुणधर्मांमुळे हळूहळू लोकप्रिय होत आहे. काळ्या मक्याचे दाणे शिजायला जास्त वेळ लागतो. पिकल्यानंतर त्याचे दाणे काळे, चमकदार आणि आकर्षक दिसतात.

काळ्या मक्याचे दाणे पिवळ्या आणि पांढऱ्या मक्यापेक्षा जास्त चवदार आणि गोड असतात.

काळ्या मक्याचे उत्पादन : काळ्या मका पिकाला चांगल्या वाढीसाठी उष्ण हवामानाची गरज असते. लागवड ओळींमध्ये केली जाते आणि ओळीत रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६० ते ७५ सें.मी ठेवावे. रोपावस्थेत या पिकाला जास्त पाणी द्यावे लागते. एक एकर जमिनीत ८ किलो बियाण्यापासून शेतकरी २६ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते. एकूणच, काळा कॉर्न केवळ चवदारच नाही तर भरपूर पोषक देखील आहे, ज्याचा वापर आरोग्याच्या दृष्टिकोनातून खूप फायदेशीर आहे. आत्तापर्यंत आपल्या देशात शेतकरी पांढरा आणि पिवळा मका घेतात, पण काळा मका पिकवण्याकडेही शेतकर्यांचा कल वाढत आहे.

# ओव्हरडोज म्हणजे काय ? कसा ओळखावा; फळ पिकांना कोणती योग्य पद्धती वापरावी

शेतकरी शेती करताना अधिक खतांचा व औषधांचा वापर करतात. त्याचा परिणाम शेत जमीनीवार होत असतो. फलबागा व भाजीपाल्याची वाढ खुंटते. पिकाना अधिक डोज दिल्यास कीडिंचा प्रदुर्भाव होतो. फळ झाडांना अधिक खते दिल्यास ते जमीनितील पोषक घटक शोषून घेण्यास असमर्थ ठरतात. फळझाडांना अधिक खते दिल्यास जमीनिवर त्याचे घातक परिणाम होतात. जमीनित जे पोषक सूक्ष्मजीव असतात त्यांच्या कार्य क्षमतेवर परिणाम होतो. मुळे अकार्यक्षम होतात.

रासायनिक खताचे मोठे तोटे : फळझाड़े त्यांच्या मुळाशी जे पोषक घटक असतात त्यांच्याशी जुळवून घेते. त्यांची संगती चांगली झाली तर फलझाड़े छान वाढतात व त्याचा फायदा उत्पादनवर होतो. म्हणजेच फळ लागवडीत योग्य प्रमाणात खत वापरले तर फळे चांगली लागतात. वनस्पती आणि मानव यांचे सारखेच आहे. जास्त जेवण म्हणजे माणूस सुस्त होतो. अर्थात योग्य प्रमाणात अन्न घेतले थोडे पोट रिकामे ठेवले तर माणसात स्फूर्ति उत्साह राहतो. माणूस चांगले काम करू शकतो. त्याचप्रमाणे योग्य पद्धतीने खते देणे आवश्यक आहे.

जास्त खते जास्त धोका : फळबागांना जास्त खते देणे हानिकारक आहे. शेतकरी बहुदा आपल्या पिकासाठी नायट्रोजन जास्त वापरतात. मोठ्या प्रमाणात नायट्रोजन वापर केल्यामुळे काही प्रमाणात



नायट्रोजनचे बाष्पिभवन होते. तर काही प्रमाणात पाण्याद्वारे जमीनित जाते. यउलट ज्या पिकाना योग्य खते मिळतात त्यांची वाढ योग्य होते.

खतांचे प्रमाण जास्त होत असल्याचे परिणाम : १.झाडांची खालची पाने पिवळी पडतात किंवा सुकतात. २ पानाच्या कडा तपकिरी होतात. आतील शिरासुद्धा पिवळ्या पडतात. ३ झाडांची मुळे सुकतात, काळी पडतात, सडतात ४ फळझाडे वाढत नाही वाढ खूंटते, किंवा पाने गळतात.

खते जास्त दिल्या गेल्यास कोणते उपाय करावेत? : फळ झाडांना जास्त खते दिल्या गेल्यास अशा वेळी फळ झाडांना अधिक काळा पर्यंत सतत पाणी देत राहा. शक्य असल्यास मुळा जवळील खत असल्यास बाजूला करा. ज्यामुळे खतांचे प्रमाण कमी होवून पोषक घटकांचा पुरवठा होण्यास मदत होईल.

योग्य खोलीवर खतांचा वापर : पाण्यात विरघळणारी खते पृष्ठभागावर पसरवली जात नाहीत परंतु १० ते १५ सें.मी. खोलीवर असलेल्या आंतरपिकांना ट्रॉवेलच्या सहाय्याने दिली जातात किंवा ऊस, कापूस, भाजीपाला पिकांसाठी कुदळीच्या सहाय्याने खत जमिनीवर पसरवले जाते. खतातील पोषक घटक सक्रिय मुळांच्या जवळ आल्याने पोषक तत्वांची कार्यक्षमता वाढते. सोडियमची कमतरता कमी करते, फॉस्फरस स्थिरीकरण कमी करते. या पद्धतीचा वापर पेरणीपूर्व तसेच पेरणीनंतरच्या खतासाठी करता येतो. अघुलनशील रासायनिक खते आणि माती कंडिशनरसाठी ही पद्धत वापरू नका.

ओळींमध्ये पेरा : खते व बियाणे एकाच वेळी दोन नांगराने पेरल्याने खतांची कार्यक्षमता वाढते. दाणेदार खते पेरणीसाठी योग्य आहेत. या पद्धतीत खत बियाण्याच्या बाजूला दोन ते तीन सेंटीमीटर खाली आणि दोन ते तीन सेंटीमीटर खाली येते. त्यामुळे बियांचे नुकसान होत नाही. . मुळांद्वारे योग्य प्रमाणात शोषण केल्याने खतांची कार्यक्षमता वाढते.

युरिया खत बियाण्यांमध्ये मिसळून पेरणी करू नये : उभ्या पिकांमध्ये, प्रत्येक ओळीच्या एका बाजूला तणांच्या साहाय्याने उथळ चर तयार करून किंवा फावडे वापरून आणि खते टाकून मातीचे आच्छादन करावे. विशेषत: भाजीपाला पिके, लांब अंतरावरील पिके उदा. ही पद्धत मका, ज्वारी, ऊस, कापूस यासाठी उपयुक्त आहे. कोरडवाहू तसेच बागायती शेतीमध्ये, पेरणीच्या वेळी खताच्या दोन चरांचा वापर करणे ही उत्तम पद्धत आहे. या पद्धतीमुळे खतांचा कार्यक्षम वापर करून पिकांचा प्रतिसाद वाढू शकतो.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३५० : नेपोटियानसने रोममध्ये घुसून स्वतःला सम्राट घोषित केले.
१०९८ : पहिली क्रुसेड आठ महिने चाललेल्या वेढ्यानंतर क्रुसेडरांनी अँटियोक शहर जिंकले.
१५३९ : एर्नान्दो दि सोतोने फ्लोरिडा स्पेनचा भाग असल्याचे जाहीर केले.
१६६५ : जेम्स स्टुअर्टने नेदरलँड्सच्या आरमाराला हरवले.
१८१८ : मराठेशाहीचा अस्त शेवटचे पेशवे बाजीराव हे मध्यप्रदेशातील असीरगढजवळ ढोलकोट येथे जनरल माल्कम याच्या स्वाधीन झाले आणि त्यांनी मराठी राज्य इंग्रजांच्या कडे सोपवले . नंतर इंग्रजानी शनिवार वाड्या वर कब्जा केला आणि तिथे युनियन जॅक फडकला
१८३१ : 'भारतीय महिला विद्यापीठ' या संस्थेची स्थापना. १९२० मध्ये 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ' (एस.एन.डी.टी.) असे नामांतर.
१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध कोल्ड हार्बरची लढाई.
१८८९ : कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेने कॅनडाचे दोन्ही तीर जोडले.
१९१५ : इंग्रज सरकारने रवींद्रनाथ टागोर यांना नाईटहुड ही पदवी बहाल केली.
१९१६ : महर्षी कर्वे यांनी भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली.
१९३७ : ड्युक ऑफ विन्डसर व वॉली सिम्पसनचे लग्न.
१९४० : डंकर्कची लढाई जर्मनीचा विजय. दोस्त सैन्याने पळ काढला.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन वायूदलाने पॅरिसवर बॉम्बवर्षाव केला.
१९४३ : झूट सुट दंगे लॉस एंजेल्स नेव्हल रिझर्व आर्मरीतील ६० लोकांच्या टोळक्याने हिस्पॅनिक दिसणार्या लोकांना बडवून काढले.
१९४७ : हिन्दूस्तानच्या फाळणीची मांउंटबॅटन योजना जाहीर झाली.
१९५० : मॉरिस हेझॉंग आणि लुईस लॅचेनल यांनी अन्नपूर्णा या ८,०९१ मीटर उंच असलेल्या शिखरावर प्रथमच यशस्वी चढाई केली.
१९६२ : एर फ्रांसचे बोईंग ७०७ प्रकारचे विमान पॅरिसहून निघताना कोसळले. १३० ठार.
१९६३ : नॉर्थवेस्ट एरलाइन्सचे डी.सी. ७ प्रकारचे विमान ब्रिटिश कोलंबियाच्या किनाऱ्याजवळ कोसळले. १०१ ठार.
१९६८ : अँडी वॉरहोल वर खूनी हल्ला.
१९६९ : व्हियेतनामजवळ ऑस्ट्रेलियाची विमानवाहू नौका एच.एम.ए.एस. मेलबॉर्न व अमेरिकेची विनाशिका यु.एस.एस. फ्रँक ई. एव्हान्सची टक्कर. एव्हान्सचे दोन तुकडे झाले.
१९७३ : सोवियेत संघाचेचे टी.यु. १४४ प्रकारचे विमान फ्रांसमध्ये गुसेनव्हिल जवळ कोसळले. १४ ठार.
१९७९ : मेक्सिकोच्या अखातात इहटॉक १ या खनिज तेलाच्या विहिरीला आग लागली. ६,००,००० टन तेल समुद्रात पसरले.
१९८४ : ऑपरेशन ब्ल्यु स्टार भारतीय सैन्याने आत घुसलेल्या अतिरक्यांना हुसकावण्यासाठी अमृतसरच्यासुवर्णमंदिरावर हल्ला चढवला.
१९८५ : भारत सरकारने पाच दिवसांच्या कार्यदिवस आठवड्याला सुरुवात केली.
१९८९ : थ्येनआनमन चौकात सात आठवडे तळ ठोकलेल्या प्रदर्शकांना घालवण्यासाठी चीनने लश्कर पाठवले.
१९९१ : जपानमधील माउंट उंझेन ज्वालामुखीचा उद्रेक. ४३ पत्रकार व संशोधकांचा मृत्यू.
१९९८ : जर्मनीमध्ये आय.सी.ई रेल्वेगाडी रुळांवरुन घसरली. १०१ ठार.
१९९८ : जमिनीवरील हवेतील लक्ष्यावर मारा करणाऱ्या त्रिशूल क्षेपणास्त्राची द्रोणाचार्य या युद्धनौकेवरून कोचीजवळ यशस्वी चाचणी झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४४ : प्रसिद्ध भारतीय पत्रकार, कादंबरीकार, नाटककार आणि निबंधकार व साहित्यिक बाळकृष्ण भट्ट यांचा जन्मदिन.
१८६५ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पाचवा) यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी १९३६)
१८६७ : भारतात बालविवाह नियंत्रण कायदा लागू करणारे प्रख्यात भारतीय शैक्षणिक, न्यायाधीश, आणि राजकारणी बिलास सारडा यांचा जन्मदिन.
१८९० : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक बाबूराव पेंटर यांचा जन्म (मृत्यू: १६ जानेवारी १९५४)
१८९० : खान अब्दुल गफारखान, सरहद्ध गांधी. (मृत्यू: २० जानेवारी १९८८)
१८९२ : लेखिका तसेच बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑक्टोबर १९८६)
१८९५ : चीन, इजिप्त आणि फ्रान्समधील राजदूत के.एम. पणीक्कर यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९६३)
१९२४ : तामिळनाडूचे १५ वे मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांचा जन्म.
१९३० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी जॉर्ज फर्नांडिस यांचा जन्म.
१९४१ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाद्धीश न्यायमूर्ती रुमा पाल यांचा जन्मदिन.
१९६६ : पाकिस्तानी क्रिकेट कप्तान जलदगती गोलंदाज वासिम अक्रम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५७ : मानवी शरीरातील रक्ताभिसरणाची क्रिया स्पष्ट करणारे इंग्लिश शरीरशास्त्रज्ञ विल्यम हार्वी यांचे निधन. (जन्म: १ एप्रिल १५७८)
१९३२ : उद्योगपती सर दोराबजी टाटा यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८५९)
१९५६ : स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, राष्ट्रमत आणि स्वतंत्र हिन्दुस्तानचे संपादक, लेखक व नाटककार वामन गोपाळ तथा वीर वामनराव जोशी यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १८८१)
१९७७ : आर्चिबाल्ड विवियन हिल, नोबेल पारितोषिक विजेता ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ.
१९८९ : इराणी धर्मगुरू आणि राजकारणी रुहोलह खोमेनी यांचे रनिधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९०२)
१९९० : इंटेल कॉर्पोरेशन चे सहसंस्थापक रॉबर्ट नोयिस यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२७)
१९९७ : चित्रपट व नाट्य अभिनेत्री मीनाक्षी शिरोडकर यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९१६)
२००० : डॉ. आर.एस. अय्यंगार, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ऍप्लिकेशन सेंटरचे संचालक.
२०१० : अजय सरपोतदार, मराठी चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक.
२०१४ : भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे तिसरे उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर

# लिंबागणेश येथील अतिक्रमणाचा प्रश्न चिघळला

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे गाव असणाऱ्या लिंबागणेश गावातील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गावठाणच्या स्मशानभूमीत कित्येक वर्षांपासून हातावर पोट भरणा-या हॉटेल, पानटपरी व लहान सहान उद्योग करणाऱ्या गोरगरिबांच्या अन्नात माती कालवली जाणार असून गावातील गटातटाच्या हेवेदाव्याचा या गोरगरीबांना आर्थिक फटका बसणार असल्याची चिन्हे दिसत असुन रविंद्र निर्मळ यांनी गावगुंड हाताशी धरून महामंडळाच्या कॅन्टीन जागेवर पत्र्याचे शेड टाकुन अतिक्रमण केले असून चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी कोणाचीही स्वाक्षरी न करता केवळ गावातील प्रतिष्ठित १२ लोकांची नावे टाकुन तहसीलदार बीड यांच्याकडे यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आल्यानंतर काल दि.०१ रविवार रोजी तलाठी गणपत पोतदार,मंडळ अधिकारी जायभाये आणि डेपो



मॅनेजर डोके यांनी घटनास्थळी पाहणी करून काम थांबवले. त्यामुळे रविंद्र निर्मळ यांनी आज दि.०२ सोमवार रोजी तहसीलदार बीड यांना लिंबागणेश गावातील गट नंबर १ मधील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी असलेली सर्वच अतिक्रमणे काढण्यात यावीत.तसेच स्मशानभूमीची मोजणी करून खुणा करून हद्द कायम करून देण्यात यावी.

लिंबागणेश ते जुना वैद्यकिन्ही रस्ता शासकीय ३३ फुटाचा रस्ता असुन मोकळा करून देण्यात यावा तसेच तसेच लिंबागणेश

## गोरगरीबांचा सहानुभूती पुर्वक विचार करावा -डॉ.गणेश ढवळे

ते वाघिरा जुना रस्ता ३३ फुटाचा शासकीय रस्ता असुन तो मोकळा करून देण्यात यावा अन्यथा ३० जुन रोजी तहसीलदार बीड यांच्या दालनात आत्मदहन करणार असल्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार बीड यांना दिला आहे. माझ्या शेड विरोधात तहसीलदार यांना दिलेली तक्रार खोटी असुन तक्रारदार यांच्या निवेदनावर स्वाक्षरी नाहीत. तसेच त्यांना विचारणा केली असता आम्हाला माहीत नसल्याचे सांगितले.तसेच बसस्थानक ठिकाणी ३०बाय २० ची सहन जागा शिल्लक असुन या जागेवर महिलांसाठी , प्रवाशांसाठी सहन जागा शिल्लक आहे. काही जातीयवादी लोकांनी गावात तेढ निर्माण करण्यासाठी राजकीय सुबुद्धीने एका दलित कार्यकर्त्या विरोधात रचलेले षडयंत्र आहे.त्यामुळे मला न्याय न मिळाल्यास तहसीलदार यांच्या दालनात आत्मदहन करणार असल्याचे रविंद्र निर्मळ यांनी म्हटले आहे. लिंबागणेश येथील आठवडाभरात अतिक्रमण काढण्यासाठी केलेल्या गटातटाच्या तक्रारी मधुन गावातील आणि परीसरातील पत्र्याच्या शेडमध्ये हातावर पोट भरणा-या हॉटेल, पानटपरी, विद्युत मोटरी दुरूस्ती, मांसविक्रेते, जनरल स्टोअर्स,किराणा दुकान, हार्डवेअर आदी ७० पेक्षा जास्त दुकानातून गोरगरीबांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत असुन शासनाने सर्वच अतिक्रमण धारकांवर कारवाई करत अतिक्रमण काढण्यापुर्वी सहानुभूती पुर्वक विचार करावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभार प्रा. रवींद्र जोगदंड यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. अनंता साळुंके, प्रा. रूपेश कोकाटे, प्रा. अशोक दहिफळे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांचे व ओबीसी जातीचे आर्थिक व सामाजिक राजकीय नुकसान केले - वसंत मुंडे

परळी। प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या केंद्र व राज्यातील सरकारने शेतकऱ्यांची भाव पाडून आर्थिक लूट केली व जनगणनेतून आरक्षणासाठी ओबीसीच्या जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला नाही असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांचे खरीप व रब्बीचे शेती मालाचे उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्यामार्फत मागून घेऊन टॅक्समध्ये सवलत देऊन संपूर्ण शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त करण्याचा केंद्रातील व राज्यातील सरकारचा अजिंठा आहे. अमेरिका ब्राझील अर्जेंटिना चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते.

भारत देशातील सोयाबीन व भाजीपाला फळे इतर पिकांमध्ये सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात करा मध्ये सवलत धोरणामुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या चिंताजनक असून संपूर्ण शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यापुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत . संपूर्ण देशातील जातनिहाय जनगणना करण्याकरिता आर्थिक शैक्षणिक सामाजिक राजकीय विविध निकष दर्शवून मूल्यमापन जातनिहाय आरक्षणासाठी करणे काळाची गरज आहे. परंतु आरएसएस च्या विचारधारेचे केंद्र व राज्यातील बीजेपी सरकार संपूर्ण देशातील आरक्षण रद्द करण्याची वाटचाल करीत आहे. त्यासाठी शेतकरी व ओबीसीच्या नेत्यांनी जनतेने केंद्र व राज्यातील सरकारच्या विरोधात प्रचंड मोठे जनआंदोलन उभे करण्याची तयारी करावी. शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. शेती मधील खते बी बियाणे कीटकनाशक औषधी ट्रॅक्टर खर्च खुरपणी फवारणी मळणी यंत्र मजुरी दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेतीमालाचे भाव पाडले, त्यामुळे शेती परवडत नाही .उत्पादनातून खर्च निघणे शक्य नाही, शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही. हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारपेठेतून खरेदी केला जात आहे. शासनाकडून कोणतेही कारवाई नियमानुसार केली जात नाही. शासनाकडून आधारभूत किंमत शेतीमालाला मिळत नाही, बाजारपेठेवर नियंत्रण नाही. शेतकरी व ओबीसी समाजाचा कर्दनकाळ हा केंद्र व राज्य सरकार चे निष्क्रिय धोरण जबाबदार असल्याचा आरोप कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

## जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांनी तंबाखू व तत्सम पदार्थांपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा घेतली. प्रास्ताविक डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले.

आभारप्रदर्शन प्रा. अनिल जोगदंड यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## बिंदूसरा मध्यम प्रकल्पावर जाणे धोकादायक

### सावधानता अन सुरक्षिततेचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

बिंदूसरा मध्यम प्रकल्प, मौजे पाली ता.जि. बीड येथे धरण पूर्ण क्षमतेने भरले असून धरणाच्या सांडव्यावरून मोठया प्रमाणात पाणी वाहू लागले आहे. या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठया संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून, नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

धरण परिसरात गर्दी करु नये: पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असून, अचानक पाण्याची पातळी वाढू शकते.त्यामुळे नागरिकांनी धरण परिसरात जाणे टाळावे. फोटो आणि सेल्फी टाळावेत: धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक आहे अशा कृतीमुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. पालकांनी मुलांवर लक्ष ठेवावे: मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हलचालीवर लक्ष ठेवावे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे: स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. आपल्या आणि आपल्या कुंटूंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील सूचनांचे पालन करणे अत्यांवश्यक आहे.धरण परिसरात कोणत्याही प्रकारचे बेजबाबदार वर्तन टाळावे.

## आनंदी आणि समाधानी जीवनासाठी शिक्षणासोबत नातेसंबंध जपा -बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये अलौकिक बुद्धिमत्ता आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहून आपल्या आयुष्याच्या ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास त्याला यशापासून कोणीही रोखू शकणार नाही. ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी गावातच मोफत शिक्षणाची सोय मी करू शकलो याचे मला समाधान वाटते. गेवराई शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड मेहनत घेण्याची जिद्द, हिम्मत आणि चिकाटी असल्याने विविध क्षेत्रातील यशस्वी होतात याचा अभिमान वाटतो. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये पालकांसोबत शिक्षकांचा मोठा वाटा आहे असे गौरोद्गार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त करून कुटुंब आणि नातेगोते सांभाळा. कारण त्याशिवाय पुढील आयुष्य आनंद आणि समाधानाने जगता येत नाही असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळेतील शालांत परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचा अध्यक्ष समारोप करताना ते बोलत होते. कार्यक्रमास नायब तहसीलदार मोरे, पोलीस उपनिरीक्षक



जंजाळ, बीड जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित, माजी आरोग्य व शिक्षण सभापती पंढरीनाथ लगड, युवानेते रोहित पंडित, शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या सचिव अनुरूपताई पंडित, युवानेते यशराज पंडित, बबलू खराडे, सरपंच संभाजी आहेर, सरपंच मुकुंद बाबर, शेख शहदाद, साद चाऊस, गोविंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी शालांत परीक्षा २०२५ मध्ये सीबीएससी बोर्डात छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूल मधून ९५ टक्के गुणाने सर्व द्वितीय ठरलेल्या राजवर्धन रोहित पंडित याच्यासह रानमळा, भोगलगाव, खांडवी, माटेगाव, रोहितळ, शेकटा या शाळांमधून प्रथम आलेल्या- निकम साक्षी सुनील, मडके पुजा ज्ञानेश्वर, शेजुळ रोहित ताराचंद, चव्हाण अजय दिगंबर, गायकवाड वैष्णवी अशोक, कांबळे गौरी दादाराव यांना प्रत्येकी २१०० रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यासोबतच द्वितीय - देवकुळे ज्ञानेश्वरी जगन, धुमाळ प्रकाश बापूराव, राठोड स्नेहल शिवाजी, सय्यद अनाम कबीर, बेलगुडे मुकेश विलास, शेंबडे ऋषिकेश संजय, महानोर रूपाली नारायण, तृतीय - मुळूक ऋतुजा दत्ता, गायकवाड भक्ती रामेश्वर, राठोड अश्विनी केशव, माळी नेता सतीश, कोकाट भाग्यश्री शहादेव, येळे वैष्णवी मच्छिंद्र यांच्यासह १२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह आणि पुष्पहार देऊन पालकांसह सत्कार करण्यात आला.

## कवडगाव ते चाकरवाडी पायी दिंडी सोहळा

कवडगाव । प्रतिनिधी

२१ व्या शतकातील महान संत विभूती ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कवडगाव ते श्रीक्षेत्र चाकरवाडी पायी दिंडी सोहळा दिनांक/६२०२५ शुक्रवार रोजी प्रस्थान करणार आहे . या पायी दिंडी वारीचे सलग हे १९ वे. वर्ष आहे. या दिंडी सोहळ्याचा प्रवास कवडगाव येथील ग्रामदैवत बजरंग बली चे दर्शन घेऊन ग्रामप्रदर्शना करून दिंडी कवडगाव मधून प्रस्थान करणार आहे .या दिंडीचा पहिला मुक्काम भगवान बाबा प्रतिष्ठान वडवणी येथे होईल.

मजल दरा मजल करीत वारीचा दुसरा मुक्काम दिनांक ७/६/२५ रोजा खडकी येथे असेल.तसेच ८/६/२५ रोजी दिंडी कोरडेवाडी येथे मुक्काम होईल .यानंतर ९/६/२५ रोजीचा मुक्काम देवगाव येथे असेल दिनांक १०/६/२५ रोजी पायी दिंडी सोहळा श्रीक्षेत्र चाकरवाडी या ठिकाणी होईल. दिनांक ११/६/२५ रोजी सकाळी हा दिंडी सोहळा तीर्थक्षेत्र चाकरवाडी ग्रामप्रदक्षिणा करून हा पायी दिंडी सोहळा माऊली महाराजांच्या पुण्यस्मरणार्थ काल्याचे किर्तन श्रवण करण्यासाठी सभा मंडपामध्ये येईल .

काल्याच्याकीर्तनाने व महाप्रसाद घेऊन दिंडीचा समारोप होईल .या पायी दिंडी सोहळ्यामध्ये हरिनामाच्या गजरासह भजन, गवळणी, भारुड व रात्रीच्या मुक्कामी हरी किर्तन सेवा होणार आहे .तरी या पायी दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविक भक्तांनी ,माता-भगिनींनी सहभागी होऊन या पायी दिंडी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व भजनी मंडळ कवडगाव यांनी केले आहे

# जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह' आदित्य डेंटल कॉलेजमध्ये उत्साहात साजरा

### विद्यार्थ्यांचा जनजागृती उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद; रॅली, पोस्टर स्पर्धा, व्याख्यानांसह आरोग्य शिबिर

बीड । प्रतिनिधी

तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जागतिक तंबाखू विरोधी सप्ताह या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला आहे. या महाविद्यालयात कम्युनिटी डेंटिस्ट्री विभाग समाजातील दंत आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्य तपासणी तसेच जनजागृती शिबिरे आयोजित करत आहे. या उपक्रमांतर्गत, तंबाखूविरोधी जनजागृती आणि सल्ला देण्याची सेवा देखील दिली जाते. या सेवांसाठी कॉलेजकडे सुसज्ज मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त जनजागृती करून तरूण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे आवाहन कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी केले. आदित्य शिक्षण संस्थेत ३१ मे रोजी जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त आदित्य डेंटल कॉलेज, बीड येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'तंबाखू विरोधी सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा बोलत होत्या.




महाविद्यालयाच्या वतीने २७ मे ते ५ जून दरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहात विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी एकत्र येऊन तंबाखूच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली, पोस्टर स्पर्धा, व्याख्याने व नाटिका यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तंबाखू आणि त्याच्या सेवनामुळे होणाऱ्या आरोग्यावरच्या गंभीर परिणामांविषयी जनतेमध्ये जागरुकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आदित्य डेंटल कॉलेजने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यविषयक जनजागृतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाविद्यालयाच्या कम्युनिटी डेंटिस्ट्री विभागातर्फे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात, स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यामध्ये दंत तपासणीसह तंबाखू सोडण्यासाठी समुपदेशन सेवा दिली गेली. या सेवेसाठी कॉलेजकडे उपलब्ध असलेल्या मोबाइल डेंटल व्हॅन आणि पोर्टेबल डेंटल चेअर चा योग्य वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामाजिक नाटकांनी प्रेक्षकांना भावनिक दृष्ट्या हेलावून टाकले. तंबाखूचे परिणाम दाखवणाऱ्या या सादरीकरणानं उपस्थितांमध्ये विचारप्रवृत्तता निर्माण केली. या सप्ताहाच्या आयोजानामागील प्रमुख हेतू म्हणजे तरुणांमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती करणे आणि आरोग्यविषयक सकारात्मक वातावरण निर्माण करणे हा होता. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यांचा समाजाशी असलेला संवाद हा खूपच प्रभावी ठरला. डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य विषयक जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनी नमूद केले की, ''या उपक्रमांतून केवळ महाविद्यालया पुरतेच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी आरोग्य दूत घडवण्याचे काम आपण करत आहोत.'' 'तंबाखू विरोधी सप्ताहा'च्या निमित्ताने आयोजित उपक्रमांनी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर संपूर्ण बीड शहरात जनजागृतीचे वारे वाहू लागले आहेत. अशा कार्यक्रमांमुळे तरुणांमध्ये आरोग्याबाबतची जागरूकता वाढून त्यांना सशक्त, निर्णयक्षम आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार बनवण्यास मदत होते. डॉ. आदिती सारडा, प्राचार्य रॉबर्ट जस्टीन, उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी अभिनंदन केले.

## अहिल्यादेवी होळकर जयंती जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये उत्साहात साजरी



बीड। प्रतिनिधी

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती आणि केंद्रातील लाभार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमास 'वामा' चित्रपटाचे नायक डॉ. महेशकुमार वनवे, प्राचार्य डी. जी. तांदळे सर, सेवानिवृत्त इंजिनीयर कांचनजी गायकवाड सर, डॉ. संजय तांदळे, प्रीतीताई बागलाने, काकडहिरा गावाच्या सरपंच कौशल्याताई, नितीन जायभाय सर (बीड शहर बचाव अभियान), बाजीराव ढाकणे (बेटी बचाव अभियान), निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, छाया सरोदे यांची विशेष उपस्थिती होती.डॉ. महेशकुमार वनवे यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन करत त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. त्यांनी अहिल्याबाईंनी घेतलेले जनहितकारी निर्णय, त्यांच्या दूरदृष्टीचा आणि पराक्रमाचा गौरव केला. प्राचार्य डी. जी. तांदळे यांनी देखील अहिल्याबाईंच्या राज्यकारभारातील सखोल पैलूंवर प्रकाश टाकत त्यांच्या कार्यातून आजच्या समाजाला प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.माजी मुख्याध्यापक मस्के सर यांनी स्वतः रचलेली अहिल्याबाईंवरील कविता सादर करून उपस्थितांना भावविवश केले.इंजिनीयर कांचनजी गायकवाड यांनी त्यांच्या राज्यकारभाराच्या कार्यशैलीवर भाष्य करत, त्या खऱ्या अर्थाने जनतेच्या राणी कशा होत्या हे सोप्या भाषेत सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी व्यवस्थापक राजू वंजारे यांनी निवारा केंद्राची ओळख करून देत त्याच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी संचालक अभिजीत वैद्य यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमात जिव्हाळा निवारा केंद्रातील बेघर, अनाथ लाभार्थींचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनाने आणि प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासूर रोखायलाच हवा अन्यथा परिस्थिती गंभीर

## ना. पंकजाताई मुंडे यांची परळीत जनजागृती मोहीम, वैद्यनाथ मंदिरात कापडी पिशवी वेडिंग मशीनचे उदघाटन

परळी वैजनाथ। प्रतिनिधी
पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यामुळेच पर्यावरणाला घातक असणाऱ्या एकल प्लास्टिक वापराचा भस्मासूर आपल्याला रोखायलाच हवा, यासाठी कापडी पिशव्यांचा अधिकाधिक उपयोग करावा त्याचबरोबर आपला परिसर स्वच्छ कसा राहील यासाठी कचरामुक्त परिसरावरही लक्ष केंद्रित करून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक अशा वृक्षारोपणाकडेही प्रत्येकाने लक्ष द्यावे. एवढेच नाही तर एक झाड आई-वडिलांसाठी तर एक झाड हे





### आनंदधाम येथे वृक्षारोपण तर मंदिर परिसरात स्वच्छता मोहिम

### नागरिकांनी जास्तीत जास्त कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे केले आवाहन

आपल्या सृष्टीमातेसाठी लावावे आणि त्याचे संवर्धन करावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे आज केले.

शहरातील आनंदधाम येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण, पर्यावरण विभाग व गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने वैद्यनाथ मंदिरात ◀◀ पान ३ वर

### राज्यभरातील मंदिरांशी चर्चा करणार

राज्यभरातील मंदिरांशी चर्चा करुन कापडी पिशव्या वापरण्याचा आग्रह धरण्यात येणार आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात मंदिरं आहेत या मंदिरांमधून सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी व्हावा त्याऐवजी कापडी पिशव्या वापरल्या जाव्यात याकरिता आम्ही प्रयत्न करत आहोत अनेक संस्थांशी पत्रव्यवहार देखील केला आहे. त्या दिशेने काम करत असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

### लोकसहभाग महत्वाचा

पर्यावरण संवर्धनाचे कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येत आहेत मात्र हे केवळ प्रशासकीय पातळीवरच मर्यादित राहू नयेत यासाठी जास्तीत जास्त लोकसहभागातून हे उपक्रम यशस्वी होतील.यासाठी लोकसहभागावर भर देण्यात येत आहे. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची माझ्यापासून सुरुवात करणार असुन यापुढे माझ्या परळीतील यश:श्री व मुंबईतील रामटेक या शासकीय निवासस्थानी जे अभ्यागत मला भेटायला येतील त्यांनी प्लास्टिक पिशव्या मधून आणलेले बुके आणू नयेत. एवढेच नाही तर मला भेटायला येणाऱ्यांनी हातात प्लास्टिक पिशव्या घेऊन बुके,हारतुरे आदी आणले तर त्यांना प्रवेश बंदी केली जाईल. अधिकाधिक प्लास्टिक मुक्तीसाठी आपल्याला हे प्रयत्न करायचे आहेत. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आपण प्लास्टिक मुक्तीची व स्वच्छतेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहावे असेही पंकजाताई मुंडे यांनी आवाहन केले.

# शिवसैनिकांनो बॅनर नको, गरजवंतांना मदतीचा हात हीच माझ्यासाठी खरी शुभेच्छा -अनिल जगताप

**बीड । प्रतिनिधी**
शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस येत्या बुधवार, ४ जून रोजी असून प्रत्येक वर्षी हा दिवस जिल्हाभरातील शिवसैनिकांसाठी एक उत्सव असतो. निष्ठावंत शिवसैनिकांकडून अनिलदादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, शहरभर बॅनर्स लावले जातात आणि हा दिवस जल्लोषात साजरा होतो. मात्र यंदा

### सामाजिक उपक्रमांनी होणार अभिष्टचिंतन!

अनिलदादांच्या प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत, जिल्हाभरातील शिवसैनिक अनिलदादांच्या वाढदिवसावर होणाऱ्या विविध खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणार आहेत. अनेक ठिकाणी रेनकोट वाटप, अन्नदान, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसेच विविध समजपयोगी उपक्रमांचे आयोजन शिवसैनिक करणार आहेत.



अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक भावनिक आणि विचारप्रवृत्त करणारे आवाहन केलं आहे. त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून शिवसैनिकांना सांगितलं आहे की, ''माझा वाढदिवस बॅनरमुक्त करा. हे बॅनर लावण्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. त्याऐवजी हा पैसा गरजूंवर खर्च करा.'' अनिलदादांचे हे आवाहन केवळ एक विनंती नसून समाजासाठी आपली जबाबदारी ओळखणाऱ्या नेत्याचे भावनिक मनोगत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. अशा वेळी रस्त्यांवर भरपावसात भाजी ◀◀ पान ३ वर

# दिंद्रुड पोलीस अधिकारी निरोप व स्वागत समारंभ

दिंद्रुड । प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांची नांदेड परिक्षेत्रात व पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे यांची धाराशिव जिल्ह्यात नुकतीच बदली झाली. नव्याने प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर अंभोरा पोलीस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांची नियुक्ती झाल्याबाबत निरोप व स्वागत समारंभाचे आयोजन दिंद्रुड पोलीस ठाणे व पोलीस हद्दीतील ग्रामस्थांच्या वतीने रविवारी सकाळी करण्यात आले



होते.
सपोनी खोडेवाड हे दिंद्रुड पोलीस ठाण्याचे २८ महिने या दीर्घकाळात कर्तव्य बजावणारे एकमेव अधिकारी ठरले आहेत. त्यांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खोडेवाड यांची भूमिका प्रखर व सक्षम राहिली आहे. उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे या कर्तव्य तत्पर व खमक्या अधिकारी यांनी दिंद्रुड ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारी रोखण्यासाठी तत्परतेने भूमिका निभवली. अन्यायग्रस्तांवर अन्याय होणार नाही व पिडीताला न्याय मिळावा या हेतूने केलेल्या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कामामुळे दिंद्रुड पोलीस हद्दीतील नागरिकांनी त्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी हजेरी लावत दोघांनाही आगामी कार्यकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संजीवनी राऊत,हनुमान फपाळ, नवनाथ कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव डाके यांनी सदिच्छा भावना व्यक्त करत अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.
आपल्या भाषणात सपोनी महादेव ◀◀ पान ३ वर



पिंपळवंडी:-चित्रात दिसते ते पर्यटन स्थळ किंवा निसर्गरम्य ठिकाण नाही ते आहे पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी गावाला वळसा घालून वाहणाऱ्या नदीचे या नदीपात्रात पुलाच्या दोन्ही बाजूने बाभळीच्या झाडांसह शेवाळ- बेशरम सह अन्य झाडाझुडपांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने त्यांच्या छायेत नदीपात्र झाकून गेले आहे.बेसुमार वाढलेल्या या झाडाझुडपामुळे पावसाळ्यात नदीला पूर आला तर पुराचे पाणी वाहून जाण्यास अडथळा होऊन मोठे संकट निर्माण होऊ शकते त्यासाठी नदीचे खोलीकरण करून झाड-झुडपांचा बंदोबस्त होणे काळाची गरज आहे.

# पाटोदा कृषी विभागाचे कुंपणच शेत खातेय

पाटोदा । प्रतिनिधी
पाटोदा तालुक्यातील ५०% शेतकऱ्यांचे फार्मर आयडी परस्पर तयार करून कृषी सहायकाने स्वत:चीच नंबर टाकून फार्मर आयडी तयार केले मोफत बियाण्याला शेतकऱ्याला अडचणीत असून. शेतकरी ओटीपी काय यणा ना म्हणून परेशान असून पडताळणी केली असता. कृषी सहाय्यकाचेच नंबर त्यात आढळून आले.९३०९७९६७१० शेतकऱ्यां मोफत शासनाने त्याने उपलब्ध करून दिले असताना. २ दिवसाच्या सोडत असताना शेतकऱ्यांना आता मोफत बियाणे कसे मिळणार कृषी विभागाने स्वत:च्या खिशातून सर्व शेतकऱ्यांना बियाणे देण्याची व्यवस्था करावी शेतकऱ्यांची मागणी आहे नसता कृषी सहाय्यक आणि आंदोलन केले जाईल. शेतकऱ्यांनी सांगितले काही लोकांचे ठिबकचे अनुदान आले असून कागदपत्र अपलोड कसे करायचे त्यांना शेतकरी योजना लागू झाले असून त्यांना या अडचणी येत आहेत अनुदान कसे मिळणार पृष्ठ कृषी सायक मुळे लोकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्या कृषी सहाय्यक तात्काळ निलंबन करून कारवाई करावी अशी शासनाला विनंती करण्यात येत आहे. कृषी वाघाच्या दारात आंदोलन केले.

# किसान सभेचे विविध मागण्या- संदर्भात तहसीलदारांना साकडे

**माजलगाव । प्रतिनिधी**
अखिल भारतीय किसान सभा जिल्हा कमिटीच्या वतीने विवीध मागण्या संदर्भात मागण्या लवकरात लवकर पूर्ण करून जनतेला दिलासा द्यावा यासाठी तहसील कार्यालय माजलगाव येथे किसान सभा माजलगाव तालुका कमिटीच्या वतीने दि ०२ जुन सोमवार रोजी निवेदन देण्यात आले.



किसान सभेच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की,पिक विम्यापासून सर्व वंचित शेतक-यांना ताबडतोब पिक विमा वितरित करावा,सर्व शेतक-यांचे सरसकट संपूर्ण पीक कर्ज माफ करावे.अतिवृष्टीने नुकसान झालेल्या कांदा व केळी पंचनामे करून शेतक-यांना नुकसान भरपाई द्या.या मागण्यांना घेऊन नायब तहसिलदार यांच्या सोबत चर्चा केली यावेळी मा.क.पा.ता.सचिव कॉ.शिवाजी कुरे, कि.सभा ता अध्यक्ष कॉ.कृष्णा सोळंके, ता.सदस्य कॉ.गणेश कदम,कॉ.नितीन पवार,कॉ शेषराव आबुज,ॲड.टी.पी.रेडे,व्ही.एस.गीरी व शेतकरी उपस्थीत होते.

# माजलगाव-तेलगाव रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करण्याची मागणी

## मुक्या,बहिऱ्या शासनाला जागे करण्यासाठी ५ जुनच्या रास्ता रोकोत सहभागी व्हा -भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव-तेलगाव रस्ता गेल्या अनेक महिन्यापासून मृत्यूचा सापळा बनत चालला असून दिवसेंदिवस होणाऱ्या अपघाताची संख्या आणि त्यामध्ये मृत्युमुखी पडणारांची संख्या शेकडोवर पोहोचली आहे,याबाबत लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक डोळे झाक करत असून सरकार केवळ दारूचे परवाने देऊन त्यामधून कर वसूल करण्यात व्यस्त आहे काय असा सवाल जनतेला पडला आहे,गेल्या अनेक महिन्यापासूनची तेलगाव-माजलगाव रस्त्याच्या



डांबरीकरणाची मागणी असताना सरकारमधील आमदार मंत्र्यांसह सर्वांनीच उदासीनता दाखवल्यामुळे माजलगाव तेलगाव रस्ता डांबरीकरण होऊ शकला नाही त्याचा परिणाम म्हणून दिवसे दिवस माजलगाव-तेलगाव रस्त्याच्या भेगा मोठ्या होत चालल्या असून त्याची रुंदी दोन ते अडीच फुटापर्यंत पोहोचली आहे आणि रस्ता मृत्यूचा सापळा बनत चालला आहे, यापूर्वी देखील या रस्त्याच्या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाने आंदोलन करत पाठपुरावा केला परंतु शासनाने केवळ तात्पुरती डागडुजी करून वेळ मारून नेण्याचे काम केले,परंतु थोड्याच दिवसात हा रस्ता पुन्हा पूर्ववत झाला व मृत्यूचा सापळा बनत चालला असताना एक जून रोजी या रस्त्यावर पाच जणांचा मृत्यू झाला तरी देखील या रस्त्याकडे सरकार गांभीर्याने पाहायला तयार नसल्याने सरकारला अजून किती बळी घ्यायचेत हा प्रश्न जनतेला पडला असताना दि.०२ जुन रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्यासह माजलगाव तालुक्यातील विविध संघटना व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी उपविभागीय अधिकारी श्री गौरव इंगोले यांची भेट घेऊन सदरील रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करण्यात यावे अन्यथा दिनांक ०५ जून रोजी सकाळी १०:०० वाजता परभणी चौक माजलगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा ◀◀ पान ३ वर




आमदाराचे आभार - दरवर्षी बिंदुसरा नदी पात्रात मोठ्या प्रमाणात झाडे वाढल्याने आणि कचरा जमा झाल्याने पावसाळ्यामध्ये पुराचे पाणी शहरात घुसते आणि त्यामुळे प्रचंड नुकसान होते. हा धोका ओळखून बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप भैया क्षीरसागर यांनी पावसाळ्यापूर्वीच शहरातील बिंदुसरा पात्र साफ करून पाण्याला वाट मोकळी करून दिली. त्यामुळे शहरात पुराचा धोका टळणार आहे. पुराचे पाणी गावात शिरण्याचा धोका यामुळे टळणार असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांनी आमदार संदीप भैया क्षीरसागर यांचे आभार मानले आहेत.

# पाण्याचा लोकलढा शेवटच्या श्वासापर्यंत लढू- खा. बजरंग सोनवणे

## खासदारांच्या विनंतीनंतर घेतले उपोषणकर्त्यांनी उपचार; आंदोलन सरकारने गांभिर्याने घ्यावे- केदार

बीड, प्रतिनिधी
शेतकर्यांनी उभारलेला हा लोकलढा १४० गावच्याच शेतकर्यांचे नव्हे तर पाच तालुक्यातील शेतकर्यांचे भले करणारा हा लोकलढा आहे, हा लढा माझाच असून शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढणार असल्याचा विश्वास खा. बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला. तर, हे आंदोलन सरकारने गांभिर्याने घ्यावे, नसता महागात पडेल असा इशारा दिपक भाई केदार यांनी दिला. या भेटीनंतर उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांनी उपचार घेतले.
यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, समन्वयक दिनेश गुळवे, पुजाताई मोरे, सरपंच नवनाथ गवते, राहुल लोंढे, संतोष भारती, शिवसेना तालुकाध्यक्ष उद्धव मडके, उपजिल्हाप्रमुख काळे, ऋषीकेश बेदरे, परमेश्वर महाराज वाघमोडे, सरपंच रितेष साबळे, शेख शफिक, नारायण घोडसे, गणेश महाराज कोळेकर आदी उपस्थित होते. जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासह इतर मागण्यांसाठी ◀◀ पान ३ वर



### सर्वेक्षण करून पाणी द्यावे - राहुल लोंढे

लोकलढा आंदोलनाच्या रेट्यामुळे अधीक्षक अभियंता बीड यानी वरिष्ठांना सर्वेक्षण करण्याचे पत्र दिले आहे. हे सर्वेक्षण करून माजलगाव धरणासाठी १९८५ मध्ये ५६० दलघमी तर उजव्या कालव्यासाठी ३१८ दलघमी पाण्याची तरतूद होती. ही तरतूद २०१८ मध्ये कमी करून माजलगाव धरणासाठी २९९ दलघमी तर कालव्यासाठी २५५ दलघमी अशी कमी करण्यात आली, हे पाणी पुन्हा द्यावे अशी मागणी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक राहुल लोंढे यांनी केली.

### मंत्री राठोड यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

या उपोषणाची प्रशासनाने योग्य दखल न घेतल्याने या आंदोलनाच्या समन्वयकांनी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची भेट घेतली. यावेळी मंत्री राठोड म्हणाले शेतकर्यांचे हे प्रश्न आपण मंत्रीमंडळाच्या बैठकीत मांडू. तसेच या योग्य दखल घेण्याचे लेखी आदेशही त्यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना दिले. यावेळी मंत्री राठोड यांचे ओएसडी तात्काळ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना बोलले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# शशांक अन् लता हगवणेंच्या अटकेसंदर्भात न्यायालयाची परवानगी; येरवडा तुरुंगातून पोलीस आई-लेकाचा ताबा घेणार

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील शशांक हगवणे आणि लता हगवणे या आई-लेकाला पोलीस अटक करणार असल्याची माहिती समोर आली आहे. या दोघांच्या अटकेसाठी म्हाळुंगे पोलिसांनी पावलं टाकत या दोघांचा ताबा मिळावा यासाठी पुणे सत्र न्यायालयात अर्ज केला होता. दरम्यान आज (२ मे) सोमवारी यावर सुनावणी पार पडली असता न्यायालयाने तशी परवानगी दिली आहे. परिणामी आता येरवडा तुरुंगातून पोलीस आई-लेकाचा ताबा घेणार असल्याचे ही बोलले जात आहे.




दरम्यान, हगवणे आई-लेकाने जेसीबी विक्री करताना फसवणूक केलीये. पुण्याच्या खेड तालुक्यातील निगोजे गावचे प्रशांत येळवंडे यांनी तसा गुन्हा दाखल केलाय. मार्च २०२२पासून ॲडव्हान्स आणि कर्जाचे हफ्ते फेडण्यासाठी प्रशांत यांनी ११ लाख ७० हजार रुपये लता हगवणेंच्या खात्यावर टाकलेत. मात्र काही महिन्यांतच बँकेने प्रशांत यांच्याकडून जेसीबी ताब्यात घेतली. मग प्रकरण म्हाळुंगे पोलिसात गेलं. पण तिथं ही पोलीस अधिकारी जालिंदर सुपेकरांनी या प्रकरणात ही हस्तक्षेप केला, त्यामुळं तेंव्हा अपेक्षित कारवाई झाली नाही. असा आरोप प्रशांत येळवंडे यांनी केला आहे. वैष्णवीच्या प्रकरणानंतर मात्र जागे झालेल्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि जेसीबी ताब्यात घेतली. आता न्यायालयाने अटकेची परवानगी दिल्यानं उद्या म्हणजेच मंगळवारी (३ मे) म्हाळुंगे पोलीस येरवडा तुरुंगातून हगवणे आई-लेकाला बेड्या ठोकणार आहेत.

तक्रारदार प्रशांत येळवंडेंचा नेमका आरोप काय?

जेसीबी व्यवहारात फसवणूक झालेल्या प्रकरणात पोलीस अधिकारी जालिंदर सुपेकरांनी हस्तक्षेप केला. त्यामुळं मे २०२४ च्या तक्रारीवेळी अपेक्षित कारवाई झाली नाही. असा आरोप तक्रारदार प्रशांत येळवंडे यांनी आरोप केलाय. शशांक आणि लता हगवणेंनी प्रशांतची ११ लाख ७० हजारांची फसवणूक केली आणि बंदुकीचा धाक दाखवून कुटुंब संपवण्याची धमकी दिली. या विरोधात प्रशांतने मे २०२४ मध्ये गुन्हा दाखल केला होता. पण माझा मामा मोठा अधिकारी आहे, त्यामुळं माझ्यावर कारवाई करण्याची कोणात हिंमत नाही. असा दम शशांकने दिल्याचं प्रशांत सांगतात. वैष्णवीच्या प्रकरणानंतर मात्र जागे झालेल्या पोलिसांनी आता गुन्हा ही दाखल केला, जेसीबी ही ताब्यात घेतला आणि उद्या (३ मे) अटक ही केली जाणारेय. या संबंधीत बोलताना प्रशांत येळवंडे यांनी हा खुलासे केले.

## पवार काका-पुतण्यांची पुन्हा भेट; दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा जोर



पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार हे वेगवेगळ्या बैठकांच्या निमित्ताने एकत्र येत आहेत. रविवारी साखर संकुल येथे काका-पुतणे एका बैठकीसाठी पुन्हा एकत्र आले होते. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार असल्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

पुण्यातील साखर संकुल हे शरद पवार आणि अजित पवार यांच्या बैठकीचे केंद्रबिंदू झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. गेल्या दोन महिन्यांत पवार काका-पुतणे दुसऱ्यांदा येथे भेटले आहेत. या वेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील, राजेश टोपे आदी उपस्थित होते.

वसंतदादा शुगर इन्स्टिटच्यूटमध्ये एआय तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये कशा पद्धतीने वापर करता येऊ शकतो, यासाठी या बैठकीचे आयोजन केल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, मार्च महिन्यात रयत शिक्षण संस्थेची बैठक, त्यानंतर जय पवार यांच्या साखरपुड्यानिमित काका-पुतणे एकत्र आले होते. एप्रिल महिन्यातच पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिटच्यूटमध्ये एआय तंत्रज्ञानासंदर्भातील बैठकीनिमित्त शरद पवार आणि अजित पवार हे एकत्र आले होते.रविवारी पुन्हा वसंतदादा शुगर इन्स्टिटच्यूटच्या बैठकीनिमित्ताने हे काका पुतणे पुन्हा एकत्र आले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत विधान करून शरद पवार यांनी या चर्चेला तोंड फोडले होते. दोनच दिवसांपूर्वी त्यांनी विलिनीकरणाबाबत आपणाला कल्पना नसल्याचेही स्पष्ट केले होते. त्यातच आज पुन्हा त्यांची भेट झाल्याने लवकरच म्हणजे १० जूनपूर्वी विलीनीकरणाबाबत काहीतरी ऐकावयास मिळेल अशी चर्चा आहे. १० जून हा राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापनदिन आहे.

## पनवेल-सोमाटणे, पनवेल-चिखली रेल्वे मार्गिकांना मंजुरी

**कर्जत । प्रतिनिधी**

**केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने पनवेल-सोमाटणे आणि पनवेल-चिखलीदरम्यान पनवेल कॉर्ड लाइन्स (रेल्वेमार्गावर एका मुख्य मार्गाला जोडलेली दुसरी छोटी रेल्वे मार्गिका) बांधण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली. त्यामुळे मालवाहतूक सुरळीत, जलदगतीने होण्यास मदत होईल.**

मुंबईत रेल्वेची क्षमता वाढवणे आणि रेल्वे वाहतूक सुव्यवस्थित करण्याच्या उद्देशाने, रेल्वे मंत्रालयाने पनवेल-सोमाटणे आणि पनवेल-चिखलीदरम्यान एकूण ७.५४ किमी लांबीच्या पनवेल कॉर्ड लाइन्स बांधण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. यासाठी ४४४.६४ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प मध्य रेल्वेकडून राबविला जाईल.पनवेल हे मुंबई उपनगरीय रेल्वेच्या हार्बर मार्गावरील एक महत्त्वाचे टर्मिनल आहे. उत्तरेकडे दिवा, दक्षिणेकडे रोहा, पश्चिमेकडे जेएनपीटी आणि पूर्वेकडे कर्जत महत्त्वाचे जंक्शन आहे. सध्या, ग्रेड-सेपरेटेड क्रॉसिंग नसल्यामुळे इंजिन रिव्हर्सने वाहतुकीसाठी विलंब होतो. यावर मात करण्यासाठी, दोन कॉर्ड लाइन्स प्रस्तावित केल्या होत्या. आता त्यांना मान्यता दिली आहे.

नवीन रेल्वेच्या जाळ्यामुळे रेल्वेची क्षमता लक्षणीयरीत्या वाढेल आणि गर्दी कमी होईल. ज्यामुळे प्रवासी आणि मालवाहतूक गाड्यांची वाहतूक सुरळीत आणि जलद होईल, असे मध्य रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## 'शिरूर-पाबळ रस्ता क्र. १०३ चे निकृष्ट काम'; निलेश वाळुंज यांचे शिरूर तहसील कार्यालय येथे उपोषण सुरु

शिरूर ते पाबळ मार्गावरील रस्ता क्रमांक १०३ वरील डांबरीकरणाच्या कामात गंभीर अनियमितता आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याच्या तक्रारीनंतर नागरिकांत तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निषेधार्थ निलेश वाळुंज यांनी शिरूर तहसील कार्यालय येथे दि. २ जून पासून ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू केले आहे.

स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार संबंधित यंत्रणेकडे तक्रारी करूनही कामाची गुणवत्ता सुधारली गेली नाही. रस्त्याच्या डांबरीकरणासाठी वापरलेले साहित्य हे अपुरी टिकाऊ क्षमता असलेले असून, काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच रस्ता उखडू लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

निलेश वाळुंज यांनी उपोषणादरम्यान सांगितले की, हा रस्ता जनतेच्या सुरक्षेचा आणि दैनंदिन वाहतुकीचा महत्वाचा मार्ग आहे. पण हे काम अत्यंत हलगर्जीपणे आणि अपारदर्शक पद्धतीने करण्यात आले आहे.

जबाबदार ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे.



या उपोषणासाठी तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांनी निलेश वाळुंज यांना पाठिंबा दिला असून दोषी अधिकाऱ्यांवर मोठे ते दारावर त्वरित कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

प्रशासनाची उदासीनता

या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांच्या रोषाला आता उधाण आले असून, निलेश वाळुंज यांच्या उपोषणाला स्थानिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. उपोषणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून अजूनही कोणतीही प्रतिक्रिया आलेली नसली, तरी स्थानिक लोकप्रतिनिधींनी या विषयात हस्तक्षेप करून चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. जर त्वरित कारवाई झाली नाही, तर आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## २७ कोरोनाबाधित रुग्णांना उपचाराअंती सोडले घरी

पुणे - मे महिन्यापासून कोरोनाची सौम्य लक्षणे असलेले रुग्ण वाढत असून यावर्षी जानेवारीपासून आतापर्यंत १२१ रुग्ण कोरोनाबाधित आढळले होते. त्यापैकी २७ रुग्णांना उपचाराअंती घरी सोडले असून सध्या ९४ रुग्ण शहरात सक्रिय आहे.

त्यापैकी ८४ रुग्ण घरीच विलगीकरणात असून १० रुग्ण सरकारी, खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांना सौम्य लक्षणे असून आतापर्यंत एकाचाही मृत्यू झाला नसल्याच माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली.

महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार जानेवारीपासून आतापर्यंत ८०४ संशयित रुग्णांचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. त्यापैकी, १२१ रुग्ण कोरोनाबाधित आढळले होते. सोमवारी १३ नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहेत.तर सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये नव्याने आढळलेल्या कोरोना रुग्णांच्या पार्श्वभूमीवर पुण्यात सतर्कतेची पावले उचलण्यात येत आहेत. शहरात श्वसनविकारांच्या रुग्णांवर लक्ष ठेवले जात असून, डॉ. नायडू रुग्णालयात ५० खाटा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. औषधांचा आणि आवश्यक साधनांचा पुरेसा साठा ठेवण्यात आला आहे. सध्या रुग्णांपैकी कोणत्याही रुग्णाची स्थिती गंभीर नाही, तसेच कोणताही रुग्ण व्हेंटिलेटरवर नाही, अशी माहिती महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नीना बोराडे यांनी दिली. आरोग्य विभागाने नागरिकांना मास्कचा वापर, हातांची स्वच्छता आणि लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करण्याचे आवाहन केले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी खबरदारी अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## लाडकी बहीण योजनेत अनेक चुका झाल्या, अजित पवारांची स्पष्ट कबुली, म्हणाले

पुणे । प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. या योजनेत अनेक चुका झाल्या आहेत. सरसकट सर्वांना लाभ देणे चुकीचं होते, अशी कबुली उपमुख्यमंत्री अजित पवार (-क्षळीं झुरी) यांनी दिली आहे. योजनेतील अर्जांच्या पडताळणीचे काम सुरु असून यापुढे फक्त गरजू आणि पात्र महिलांना लाभ दिला जाईल, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. ते सोमवारी प्रसारमध्यमांशी बोलत होते.




यावेळी अजित पवार यांनी पुण्याचे कारागृह पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी हगवणे बंधुंना दिलेल्या शस्त्र परवान्याविषयी भाष्य केले. त्यांनी म्हटले की, पुणे शहरामध्ये अशाप्रकारे कोणकोणाला शस्त्र परवाना देण्यात आला आहे, हे तपासले जाईल. मधल्या काळात मी बीडचा पालकमंत्री झालो तेव्हा अशा तक्रारी आल्या तेव्हा तिथल्या एसपींनी फेरआढावा घेतला. अनेकांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले. २०२० ते २०२३ कोणाकोणाला लायसन्स दिली गेली, याचा तपास करु. त्यांची पार्श्वभूमी तपासली जाईल. ज्यांना गरज असेल त्यांचेच शस्त्र परवाने ठेवू. लायसन्स देण्याचा जसा अधिकार आहे तसा तो रद्द करायचाही आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.

तसेच निलेश चव्हाण हा आता पोलिसांच्या ताब्यात आहे. पोलिसांनी त्याला पकडून रिमांड मिळवला आहे. आता त्याची चौकशी होऊ दे. त्याच्या घरातील लॅपटॉप, मोबाईल आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. आता पोलिसांना तपास करु दे, त्यामधून कोणत्या गोष्टी बाहेर येतील, ते बघू, असे अजित पवार यांनी म्हटले.

## ज्वेलर्सच्या दुकानातून साडेचार कोटींच्या दागिन्यांची चोरी

पुणे : नारायण पेठेतील एका नामांकित ज्वेलर्सच्या दुकानातील कर्मचाऱ्याने तब्बल चार कोटी ५८ लाख रुपये किमतीचे दागिने चोरल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याविरोधात विश्रामबाग पोलिस ठाण्यात अपहार व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




या प्रकरणी दुकानाच्या व्यवस्थापकाने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल दिली आहे. प्रतीक नगरकर (वय ३५, रा. सुतारदरा, कोथरूड) असे संशयित आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नगरकर हा नारायण पेठेतील ज्वेलर्सच्या दुकानात सेल्समन म्हणून कार्यरत होता. त्याच्याकडे दागिन्यांच्या काउंटरची जबाबदारी होती.

नगरकर याने १ एप्रिल ते २६ मे २०२५ या कालावधीत विविध प्रकारच्या दागिन्यांची चोरी केली. त्यामध्ये १८० वेढण्या (२,२६२ ग्रॅम वजन) आणि ९४ सुवर्ण नाणी (२,४२६ ग्रॅम वजन) यांचा समावेश आहे. चोरी गेलेल्या दागिन्यांची किंमत चार कोटी ५८ लाख इतकी असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दागिन्यांची पडताळणी केल्यानंतर हा अपहार उघडकीस आला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे करीत आहेत.

## दोन शहराध्यक्ष आणि दोन कार्याध्यक्ष; राष्ट्रवादी काँग्रेसकडून सोयीसाठी पुण्याचे दोन भाग

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसची पुण्याची कमान आता दोन शहराध्यक्ष आणि दोन कार्याध्यक्षांच्या हाती सोपवण्यात आली आहे. त्यामुळे आता पुण्याचे दोन भाग करून हे शहराध्यक्ष स्वतंत्रपणे आपापला कार्यभार सांभाळणार आहेत. बनावट कागदपत्रे बनवल्याप्रकरणी दीपक मानकर यांनी शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर पक्षाने शहराचे पूर्व आणि पश्चिम असे भाग करून दोन जणांकडे शहराची जबाबदारी सोपविली आहे.



शहराचे मतदारसंघ निहाय भाग करण्यात आले आहेत. त्यात शहराचा पूर्व भाग म्हणजे कसबा, कॅन्टोन्मेंट, हडपसर आणि वडगाव शेरी आणि पर्वती, खडकवासला, कोथरूड आणि शिवाजीनगर हा पश्चिम भाग असे ठरवण्यात आले आहे. पूर्व भागातील चार मतदारसंघांसाठी माजी आमदार सुनील टिंगरे यांना शहराध्यक्ष केले असून, कार्याध्यक्ष म्हणून रुपाली पाटील- ठोंबरे यांना, तर दुसरे कार्याध्यक्ष म्हणून हाजी फिरोज शेख यांची निवड करण्यात आली आहे. पश्चिम भागातील चार मतदारसंघांसाठी शहराध्यक्षपदी सुभाष जगताप यांची, तर कार्याध्यक्षपदी प्रदीप देशमुख यांची फेरनिवड करण्यात आली आहे. दुसरे कार्याध्यक्ष म्हणून अक्रूर कुदळे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवडीची घोषणा पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली असून, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांना नियुक्तीपत्रे दिली आहेत.

## पवारांचे घरदार 'श्री छत्रपती'मध्ये संचालक मंडळात असताना कारखान्याचे वाटोळे केले

**सांगवी । प्रतिनिधी**

**माळेगाव सहकारी साखर कारखाना हा राज्यात उच्चांकी दर देणारा कारखाना म्हणून ओळखला जातो. सहकार क्षेत्रात या कारखान्याचा नावलौकिक आहे. सध्या माळेगाव कारखान्याच्या आजुबाजुला पवार घराण्यातील खासगी कारखाने आहेत. त्यांची गाळप क्षमता सहकारी साखर कारखान्यांपेक्षा अनेक पटींनी अधिक आहे. स्वत:चे कारखाने चालण्यासाठी सहकार मोडीत काढण्याचा डाव ते टाकत आहेत. शेजारच्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यात अजित पवार यांचे घरदार संचालक मंडळात असताना त्या कारखान्याचे सध्या मोठे वाटोळे केले असल्याची टीका माळेगाव कारखान्याचे माजी अध्यक्ष व विद्यमान ज्येष्ठ संचालक चंद्रराव तावरे यांनी केली.**

माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीसाठी चंद्रराव तावरे व रंजनकुमार तावरे या गुरु शिष्यांच्या मार्गदर्शनाखाली सांगवी (ता. बारामती) येथे सहकार बचाव शेतकरी पॅनेलच्या कार्यकर्ता मेळाव्याला संबोधित करताना चंद्रराव तावरे यांनी अजित पवार यांच्यावर ही बोचरी टीका केली.

गेल्या पाच वर्षांपासून निरा नदीच्या प्रदूषित पाण्याचा जोपर्यंत विषय मिटत नाही, तोपर्यंत तुमच्याकडे मते मागायला येणार नाही अशा वल्गना अजित पवार यांनी केल्या होत्या. अद्यापही



प्रदुषित पाण्याचा प्रश्न मिटला नसताना स्वतःच संचालक मंडळात येण्याचा निर्णय घेतला आहे. हे कितपत बरोबर आहे असा सवाल करत चंद्रराव तावरे म्हणाले, माझ्या वयावर ते बोलतात. वय झालं म्हणून काय खायला लागत नाही का असेही ते म्हणाले.

अजित पवार यांचे आजुबाजूला खासगी कारखाने आहेत. त्यांची गाळप क्षमता सुद्धा मोठी आहे. सध्या सर्वत्र ऊस पळविण्याची स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी सहकारी साखर कारखाने कर्जबाजारी करायचे आणि मोडीत काढण्याचा डाव असल्याचे सांगून चंद्रराव तावरे म्हणाले, यांची तडफड फक्त माळेगावच्या सत्तेत येण्यासाठी चाललेली आहे. त्यांना सभासदांच्या प्रपंचाचे काही सोयरसुतक नाही. परंतु माळेगाव कारखान्याचे सभासद जागृत आहेत. ते कधीही चुकीच्या लोकांच्या हातात सत्ता देणार नाहीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मागील वेळी सत्तेचा वापर करून ४ हजार ६०० मतपत्रिका मतमोजणीवेळी बाद करून कारखान्याची सत्ता त्यांनी हस्तगत केली असल्याचे सांगून चंद्रराव तावरे म्हणाले, या संचालक मंडळाने चुकीचा कारभार करीत कारखाना कर्जबाजारी करून ठेवला आहे.सत्तेचा वापर करून माळेगाव कारखान्याची निवडणूक चार महिने लांबणीवर टाकली असल्याचे सांगून रंजनकुमार तावरे म्हणाले, मागच्या निवडणुकीत खा. शरद पवार यांना सन्मानाने माळेगाव कारखान्यावर आणण्यासाठी सत्ता द्या. मात्र सत्ता येऊन पाच वर्षे संपली तरी किती वेळा शरद पवारांना कारखान्यावर आणले हे जागृत सभासदांना चांगले माहीत आहे. त्यांच्या संचालक मंडळाने चुकीचा कारभार केला म्हणून स्वतःला संचालक मंडळात यावं लागतंय ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल असेही रंजनकुमार तावरे यांनी स्पष्ट केले.यावेळी रंजनकुमार तावरे, ॲड. जी. बी. गावडे, युवराज तावरे-पाटील, राजेश देवकाते, ॲड. शामराव कोकरे यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन उत्तम तावरे यांनी केले. ॲड. रोहन कोकरे यांनी आभार मानले.

## बारामतीत पोलिसच असुरक्षित? थेट पोलिसाच्या अंगावर घातली कार

बारामती: शासकीय कर्तव्य बजावत असताना पोलिसाच्या अंगावर मोटार घालत त्यांना गंभीर जखमी केल्याचा प्रकार बारामतीत घडला. याप्रकरणी एका अज्ञात वाहनचालकाविरोधात बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस हवालदार संतोष दत्तू कांबळे (रा. शिर्सूफळ, ता. बारामती) यांनी याबाबत फिर्याद दिली. ते बारामती तालुका पोलिस ठाण्यात चालक पदावर कार्यरत आहेत. या घटनेत ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बारामतीत खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

गुरुवारी (दि. २९ मे) ही घटना घडली. कांबळे हे कर्तव्यावर असताना बारामती तालुका पोलिस ठाण्याजवळ ऐश्वर्या बेकरीसमोर काळ्या रंगाची दोन्ही बाजूला क्रमांक नसलेली वेरणा चारचाकी मोटारीवर चालक रहदारीच्या रस्त्यावर स्टंट करत होता.हा चालक गाडी वेडीवाकडी चालवून जनमाणसांच्या जीवितास धोका निर्माण करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कांबळे हे शासकीय वाहन घेऊन घटनास्थळी पोहोचले. त्यांच्यासोबत पोलिस हवालदार गरुड व तरंगे हे होते. या तिघांनी गाडीची पाहणी केली, त्या वेळी ही गाडी लॉक करण्यात आली होती.दरम्यान ही कोणाची गाडी आहे, याची ते परिसरात चौकशी करत असताना एक २४ वर्षे वयाचा तरुण त्यांच्याजवळ आला. पोलिसांनी त्याला नाव विचारले असता त्याने नाव सांगण्यास नकार दिला. तू मोटारीतून स्टंटबाजी का करतो, अशी विचारणा केली असता त्याने पोलिसांशी अरेरावी केली.

cmyk